# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १९०८ इ० [ अंक ५


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी २ हा. ........२ रुपये
वर्गणी आगाउच येण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
[illegible]च्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचना:— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटिसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील.
[illegible]णाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

[illegible] बँकेची सेव्हिंग ब्यांक [illegible] बँकेत खाली दिलेल्या अटीवर ठेवी [illegible] घेतात.

[illegible]त्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर [illegible] दरम्यान एक [illegible] रुपये पर्यंत [illegible] पैसा [illegible] जाईल.

[illegible] दोन अथवा [illegible] एक इसमांच्या [illegible] पैसा [illegible] आणि तो पैसा [illegible] एकास अथवा ज्यास्त इसमास अगर [illegible] कीं मयताचे मागे राहील त्यांस काढता येईल.

[illegible] दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक [illegible] तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारां[illegible] शिल्लक रकमेस व्याज नाहीं [illegible] प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A Phiilips
आकोला [illegible] १।२।०९ } एजंट
[illegible] ७३

---

## WANTED

A Good matric teacher. Wages Rs 20 at the beginning. Aply with recommendations to:–

Boys Orphanage school
Shiveny Camp.
N. 9[illegible] ALOLA.

---

### पाहिजे

[illegible] एक गुमास्ता पाहिजे. त्यास जमाखर्चाची माहिती उत्तम असावी. शिवाय कोर्टाचेंहि [illegible] करावें लागेल. हुशारी पाहून पगार दिला जाईल. गरजूंनीं खालील पत्त्यावर सम[illegible].

सही
[illegible] शिवाजी पाटील साहू
नं० ६९ [illegible] ता. बाळापूर
[illegible]

### नोटीस

कि० दिवाणी दावा नंबर २३ सन १९०७ अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचे मालमतेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं० ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस.

विद्यमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज साहेब जि० आकोले यांचे कोर्टीत

१ उमरावबेग. वा मिरजा अमीरबेग
२ हातमबेग वा मिरजा अमीरबेग—अज्ञान.

अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमतेचें संरक्षण करण्याबद्दल अर्जदार महमद वजिर वलद महमद हकीम रां० मोहाळे ता. आकोट यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचें अगर त्याचें माल मिळकतीचें संरक्षण करण्याकारितां दाखला मिळावा ह्मणून अर्ज केल्यावरून त्या अर्जाची चौकशीची तारीख १७ माहे २ सन १९०८ इसवीं रोजीं आकोलें ठिकाणीं नेमली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरी अज्ञानाचें पालन अगर त्याचें मालमतेचें संरक्षण करण्याकारितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरी तारखेस येऊन हजर व्हावें आणि आपल्यास कां नेमावे अशा बद्दल जे कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकारितां हजर करावा.

आज तारीख २३ माहे १२ सन १९०७ इसवीं रोजीं आमचे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस दिली आहे-

A. D. C. Barr,
डिस्ट्रिक्ट आणि सेशन
नं. [illegible] जज आकोला

---

### नोटीस

हाजी अब्बा दादा कच्छी रा. आकोलें यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी गेल्या आश्विन महिन्यांत आमच्या दुकानीं एक वर्ष पावेतों काम करण्यास राहिला व त्याबद्दल तुह्मांस नफानुकसानींतील साडेपंधरा आण्याचा हिस्सा देण्याचें आह्मी कबूल केलें होतें; त्याप्रमाणें तुह्मी आमच्या दुकानीं ता. १९-१-०८ पावेतों काम केलें; नंतर तुह्मी दुसऱ्या दुकानीं राहिला आहांत. ह्या करितां ह्या नोटीशीनें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी ही नोटीस पावल्या बरोबर आमच्या दुकानी येऊन काम करूं लागावें असें न केल्यास तुमचा नफ्या वरील हक्क नाहींसा होईल व तुह्मी दुकानावर न राहिल्यामुळें आमचें जें नुकसान होईल तें तुह्मांस भरून द्यावें लागेल. तुह्मी न आल्यास आह्माला तुमच्या जागीं दुसरा मनुष्य ठेवावा लागेल व त्यामुळें होणारी नुकसानी तुह्मांस सोसावी लागेल, तिजबद्दल आह्मी कोर्टांत दावा करून रक्कम तुमच्या कडून भरून घेऊं कळावें तारीख २९।१।०८ इ.

सही
उसमान सकुर कच्छी रा.
नं. ९९ आकोलें द. खु.

---

### नोटीस

बजाई मर्द पांडूजी कुणबी रा. हिवरे तालुके मुर्तिजापूर इस:—

खालीं सही करणार कळविते कीं हिवरे ता. मुर्तिजापूर येथील शेत सर्वे नंबर ८६,६६,६७, आणि ९७ चें खातें माझी आई मंजाबाई मर्द पांडु इचें नांवानें झालें आहे तीं शेतें तूं कोणास गाहाण किंवा खरेदी देऊं नये. कळावें तारीख २८-१-०८

सही
जयवंती मर्द दत्तु कुणबी राहणार
हिवरें ता. मुर्तिजापूर निशाणी
नं. ८९ खुद्द हातची बांगडी

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार कळवितें कीं मौजे हिवरे ता. मुर्तिजापूर येथील शेत सर्वे नंबर ८६,६६,६७, आणि ९७ हीं बजाई मर्द पांडू कुणबीण इजकडून कोणीं गाहाण किंवा खरेदी घेऊं नये. ता. २८-१-०८

सही
जयवंती मर्द दत्तु राहणार हिवरें
ता. मुर्तिजापूर निशाणी खु०
नं. ८६ हातची बांगडी

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान:—हवेंत चालबिलच विशेष झाली आहे ढग वारंवार जमतात आणि पाऊस पडल्यासारखेंहि होतें. थंडीचें मान फार कमी कमी होत असून किंचित् उष्माही वाटतो. सार्वजनिक आरोग्याला प्रस्तुतचें हवामान अनुकूल नाहीं.

मध्यप्रांत व वऱ्हाड यामधील थिआसॉफिकल सोसायटीच्या शाखांचें प्रांतिक वार्षिक मंडळ यंदा मोहरमच्या सुट्टींत उमरावतीस भरणार आहे. या समारंभाला ज्यांना अध्यात्म विद्येची अभिरुची असेल त्यांनीं अवश्य जमावें अशी सूचना आहे.

समाप्ति—वऱ्हाड हायस्कूल मधील वि[illegible]र्थी मंडळीचा विचार असा दिसतो कीं तें वार्षिक संमेलन काळमानाप्रमाणें निरुपयोगी ठरत चाललें आहे ह्मणून तें यंदा भरूं नये.

पलायन—सरकारी पैशयाचा घोंटाळा केल्याबद्दल येथील डिस्ट्रीक्ट आणि सेशन्स जज्यचा माजी हेड क्लार्क गणेश वासुदेव निमकर याला पोलिस चौकशी पुरी होई पर्यंत जामीनावर दयाळूपणें खुलें केलें होतें पण ही मूर्ती जामिनदारांस दगा देऊन गेल्या सोमवार पासून कोठें तरी अदृश्य झाली आहे. आत्महत्येपेक्षां पलायनाचा मार्ग धरला असावा असा पुष्कळांचा तर्क आहे.

## स्वागतं

श्रीयुत बाबू अरविंद घोष एम्. ए. 'वंदेमातरम्' दैनिक पत्राचे संपादक यांची स्वारी धुळ्याहून गेल्या सोमवारीं आकोल्यास आली होती. यांनीं येथील लोकांच्या निमंत्रणाला व आग्रहाला मान दिला आणि ह्मणूनच त्यांचा एक दिवस येथें मुक्काम झाला. त्यांचा येथें फार उत्कृष्ट आदर सत्कार करण्यांत आला आणि राजश्री अरविंद घोष यांच्या मोठ्या विद्वत्तेनें, सुशील विनयानें आणि उदार विचारानें त्यांच्या जहाल पक्षाच्या धुरिणत्वाला मोठी शोभा व वैभव आलें आहे असें त्यांच्या परिचयावरून सर्वांस वाटलें. त्यांच्या येथील स्वल्प कालांत त्यांनीं पुष्कळास खाजगी भेटी देऊन नव्य विचार सुबोधपणें कळविले. येथील एका तालीमखान्यानें दिलेली पानसुपारी त्यांनीं प्रेमानें स्वीकारली आणि सायंकाळीं येथील श्रीराम थिएटरांत त्यांचें जाहिर व्याख्यान झालें. हें इंग्रजींत झालें. सर्वच भाषण सुश्राव्य होतें. आणि जवळ जवळ २॥ तास पूर्ण शांतपणानें हे गृहस्थ आपले स्वराज्याचे विचार प्रेमोद्गारांनीं व अंतःकारण पूर्वक कळवीत होते. सर्व भाषण नेमस्तपणानें परिपूर्ण होतें आणि व्याख्यात्याचे विचार तत्ववेत्त्याच्या भांडारगृहांतील असल्यामुळें कोणालाही दोष काढण्याला स्थळ मिळालें नाहीं पण उलट सर्व श्रोतृमंडळी आनंदानें तल्लीन होती व स्वराज्याच्या मनोराज्यांत भावी आशासमुहांचा आढावा घेत घेत मंडळी बाबू साहेबांचा निरोप घेऊन घरीं परत आली या व्याख्यानांतील मुख्य मुख्य विचार इतरत्र देण्यापूर्वी आह्मी हा सुयोग आणल्या बद्दल रा. रा. मोरो बाळकृष्ण परांजपे व त्यांचा स्नेही वर्ग यांचें अभिनंदन करितों.

## शेतकी खातें कशाकरितां आहे ?

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. पत्राच्या विषयांकडे वळण्यापूर्वी आपलें एका गोष्टी संबंधानें अभिनंदन करणें अवश्य आहे. सध्यां महाराष्ट्रांत तरी वर्तमानपत्रांत कांग्रेसच्या वेळीं अमुक मूर्खपणा कोणी केला हें ठरवितांना कोण अट्टल शिव्याबाज आहे याबद्दल एकमेकांत चढाओढ चाललेली आहे. अर्थातूच जगामध्यें कांहींहि चाललेलें असलें, ट्रान्सव्हालमध्यें हिंदी लोकांचा कसाहि छळ होत असला किंवा खुद्द हिंदुस्थानांत कसाहि दुष्काळ पडून लोकांचे प्राण वाचविण्याकरितां लाला लजपतरायां सारखे खरे देश भक्त घरोघरीं जाऊन याचना करीत असले तरी तसल्या प्रत्यक्ष उपयुक्त यत्नांकडे लक्ष देण्यास आमच्या या जहाल व नेमस्त पक्षांतील देशभक्त (?) शिरोमणींना यत्किंचितूहि फुरसत सांपडत नाहीं. अशा स्थितींत आपल्या सारखें कांहीं थोडे पत्रकार आपल्या खऱ्या कर्तव्याविषयीं जागृत आहेत याबद्दल आपलें खरोखरच अभिनंदन केलें पाहिजे. असो,

आपण आपल्या पत्राच्या पौष वद्य ९ च्या अंकांत पुण्याच्या शेतकी कालेजचें प्रिन्सिपाल डा. मान यांनीं औद्योगिक परिषदेपुढें वाचलेल्या एका निबंधाचा विचार करतांना 'शेतकी खातें कशा करितां पाहिजे' या विषयासंबंधानें विवेचन केलें आहे. या बाबतींत आपलें व डा. मान यांचें बहुतेक एकमत आहे. डा. मान हे एक इंग्रज गृहस्थ असून सरकारी हुद्याच्या जागेवर आहेत. अशा स्थितींतील गृहस्थांचें आणि एका हिंदी पत्रकाराचें मत एक होणें हा एक तऱ्हेचा आश्चर्यकारक योग आहे असें वाटेल परंतु डा. मान यांचीं व्यक्तिविषयक मतें व त्यांचा आतां पर्यंतच्या कार्यक्रम यांचा विचारकरितां यांत आश्चर्य वाटण्यासारखें फारसें नाहीं. परंतु डा. मान यांनीं व आपण या विषयाचा विचार थोडासा तात्विक दृष्टया केलेला आहे. शेतकी खात्याची स्थिति कशी पाहिजे याचा विचार करण्यापूर्वी ती स्थिति प्रत्यक्ष कशी आहे व तींत सुधारणा होणें कितपत शक्य आहे याचा माझ्यामतें आधीं विचार व्हावयास पाहिजे. या विषयाचा तात्विक दृष्टया विचार करणें फार सुलभ आहे; परंतु प्रत्यक्ष स्थितीकडे जरा बारकाईनें लक्ष देतांच हा विचार बराचसा जागचे जागींच जिरतो. याचीं कारणें अनेक आहेत.

शेतकी खात्याचा उगम कसा झाला व त्यांत स्थित्यंतरें कसकशी होत गेलीं या विषयीं विवेचन करण्यास सध्यां सवड नाहीं. तथापि त्या खात्याचें सध्यां प्रत्यक्ष काम कशा रीतीनें चाललेलें आहे हें दर्शविणाऱ्या एक दोन मुद्यांचें मी विवेचन करण्याचें योजिलें आहे. 'त्या खात्याचा रयतेशीं कांहीं संबंध न राहतां ती फक्त एक सरकारची संस्था होऊन बसवी हें तर मला मुळींच पंसत नाहीं' असें डा. मान ह्मणतात व असेंच प्रत्येक हिंदी मनुष्य व कोणीहि निःपक्षपाती इंग्रज ह्मणेल. परंतु वस्तुस्थिति याच्या बहुतेक उलट आहे शेतकी खात्यानें गेल्या दोन तीन वर्षांत केलेलें काम विशेषतः पुसा येथील 'बादशाही' एक्स्पर्टांनीं घातलेले अवडंबर पाहिलें ह्मणजे हें शेतकी खातें वाढण्याचा उद्देश काय हाच प्रश्न उभा राहतो. शेतकी खातें हें हिंदुस्थानांतील शेतकऱ्याच्या फायद्याकरितां आहे असें सरकारी अधिकारी सांगतात. मुंबइच्या गिरणीवाल्यांनीं विशेषतः उत्तमलोकवासी टाटा शेटजींनीं कापसाच्या सुधारणेच्या कामीं सरकारनें मदत करावी ह्मणून अट्टहास केला परंतु तिकडे सरकारनें बहुतेक दुर्लक्ष केलें. परंतु मँचेस्टरच्या लोकांना जेव्हां कापसाची टंचाई पडून त्या बाबतींत खटपट करण्याकरितां ब्रिटिश कॉटन ग्रोईंग असोसिएशन स्थापन झाली त्या बरोबर आमच्या सरकारचें शेतकी खातें खडबडून जागें झालें. इजीप्शियन कापसाची लागवड करण्यासंबंधानें टाटा शेटजींनीं सन १८९६ सालापासून खटपट चालविली. त्या वेळीं शेतकी खात्याला ती खटपट निरुपयोगी वाटली. परंतु इंग्रजी व्यापाऱ्यांना कापसाची जरूर लागतांच सिंधमध्यें इजीप्शियन कापसाची लागवड होऊं लागली. वास्तविक सिंधमधला हा कापूस थेट विलायतेस रवाना व्हावयाचा व त्या प्रमाणें पहिल्या वर्षी तो झालाहि, परंतु गेल्या दोन हंगामांत अहमदाबादच्या लोकांनीं नेट धरल्यामुळें निम्मा माल तरी देशांत राहिला!

पुसा येथें 'बादशाही' एक्स्पर्टांचा रेलचेल केलेली आहे. परंतु त्यांना कापूस गहूं, चहा व ताग हीं चारच पकें महत्वाचीं वाटलीं; कारण त्यांत इंग्रज व्यापाऱ्यांचा हात आहे. साखरेच्या धंद्याला सरकारनें मदत करावी ह्मणून पुष्कळ खटपट झाली परंतु हिंदुस्थानांत साखरेचे कारखाने काढणें युरोपियन व्यापाऱ्यांना फारसें फायदेशीर नसल्यामुळें सरकारलाहि या बाबतींत लक्ष द्यावेसें वाटत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत उंसाचे बाबतींत मोठ्या प्रमाणावर प्रयोग करणारें असें पुण्या जवळ मांजरी येथें सरकारी शेत आहे. या शेताचा कार्यक्रम पाहिला ह्मणजे शेतकी खात्य तील अंमलदारांच्या हुशारीचें हंसूच येतें! या शेतांत भोंवतालच्या शेतकऱ्यापेक्षां कोणतीहि नवीन रीत नाहीं. उत्पन्नाचें प्रमाण उलट कमी आहे. असें असून हें शेत आज १० वर्षे चाललेलें आहे व सरकारी रिपोर्टांतून या शेतानें केलेल्या कार्याचे गोडवे गाण्यांत येतात. येवढेंच नव्हें तर येथें लाविलेले नवीन शोध (?) शेतकऱ्यांना समजावून देण्याकरितां त्याच भागांत आणखी एक शेत उघडण्यांत आलें आहे!

सध्यांच्या शेतकीखात्याच्या अंमलदारांचे हाताखालीं अशी स्थिति असल्यास नवल काय! ज्यानें कापसाचें झाड देखील कधीं पाहिलें नाही अशा इंग्रजाला 'कॉटन एक्स्पर्ट' करण्यांत येतें तर मक्याच्या शेतांत राबणाऱ्या अमेरिकन शेतकऱ्याला उंसाच्या किंवा भाताच्या कामावर मुख्य नेमण्यांत येईल तर बरें. या फर्ड्या विद्वानांना एतद्देशीयांनीं कांहीं गोष्टी सुचविल्यास अर्थातूच त्या पटत नाहींत. हे ह्मणतील तें खरें! सध्यां पुष्कळ ठिकाणीं प्रयोगक्षेत्रें आहेत व त्यावर बहुधा शेतकी कॉलेजांतील पदवीधर व्यवस्थापक ह्मणून असतात. परंतु या पदवीधरांचें काम येवढेंच कीं त्यांनीं वरचे 'बादशाही' एक्स्पर्टांनीं किंवा प्रांतिक फर्डेतज्ञ जे हुकूम सोडतील ते कसेंही असले तरी तसेंचे तसेच हुबेहुब बजावावयाचे. हाच त्यांनीं मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग. अर्थातूच अशा लोकांना फारशा उपयुक्त शिक्षणाची जरूर नसून आज्ञाधारकपणा हा त्यांचा मुख्य गुण असला पाहिजे ही गोष्ट या अंमलदाराच्या ध्यानांत येऊन त्याप्रमाणें शेतकीच्या कॉलेजांतले अभ्यास क्रम त्यांनीं फिरवून टाकले आहेत या गोष्टीचें उत्तम उदाहरण ह्मटलें ह्मणजे पुण्याचें शेतकी कॉलेज हें होय! या कॉलेज संबंधानें सुरतेस बोलतांना 'हें कॉलेज इंग्लंडांतील प्रसिद्ध कॉलेजांच्या तोडीचें होईल' असें डॉ० मान यांनीं सांगितलें आहे. डॉ० मान यांच्या योग्यतेसंबंधानें व कार्यक्षमते संबंधानें कोणालाहि शंका नाहीं. तथापि परिस्थितीचा विचार करितां या त्यांच्या योग्यतेचा व कार्यक्षमतेचा फारसा उपयोग होणार नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें!

शेतकी खात्यातर्फे शेतकऱ्यांकरितां ह्मणून मासिक पुस्तकाच्या व इतर चोपड्यांच्या रूपानें माहिती प्रसिद्ध होत असते. हिंदुस्थानांतले शेतकरी निरक्षर असतात हें माहित असल्यामुळेंच कीं काय ही सर्व माहिती इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध होते! क्वचित एतद्देशीय भाषांत कांहीं माहिती (!) पुरविण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु मुंबई सरकारच्या मार्फत प्रसिद्ध झालेलें अशा तऱ्हेचें कोणतेंहि चोपडें पाहिलें तर ही माहिती कशा प्रकारची असते यांची चांगली कल्पना येईल! तसेंच हिंदुस्थानांतले शेतकरी गरीब आहेत व कदाचित् इंग्रजींत लिहिलेली माहिती त्यांना कोणी वांचून दाखविल या दोन गोष्टीकडे लक्ष देऊनच कीं काय या पुस्तकांची किंमत शक्य तितकी उंची ठेवण्यांत आली आहे. असो पत्र विस्तार फार झाला. परंतु शेतकीखातें कशा करितां आहे! याचें थोडेसें तरी दिग्दर्शन करण्याकरितां आपणाला इतकी तसदी द्यावी लागली. त्याबद्दल [illegible]की असावी.

पौष वद्य ११

आपला एक
शेतकीचा पदवीधर

---

वऱ्हाडसमाचार

माघ शुद्ध १ शके १८२९

### नृपनीती

इकडे मुंबईचे गव्हर्नर वर्तमानपत्रकर्त्यांस बोलावून प्लेगपासून प्रजेचा बचाव व्हावा ह्मणून इनॉक्यूलेशनचा प्रसार करण्याचे कामीं त्यांची मदत मागत आहेत, तर दुसरीकडे त्याच पत्रकर्त्यांच्या नांगा मोडून त्यांना हतबल करण्याविषयीं हिंदुस्थान

सरकारचे सल
लोककल्याणाचे
वजन अत्यंत
स वळवून घे
त्यांना मोठ्या
तेच पत्रकार
स्याचा भंग
कोणत्या तरी
विण्यासाठीं सि
च्या कल्पनार
पहात आहेत.
का काळीं
यांस कोणत्या
भिप्राय विचार
वाटतें, इतकें
टीकेपेक्षां संव
णामकारक ह
लाख्यांतील प
इकडे, कितीही
त्यांची राज्यव्र
नाहीं यासाठ
कमी कमी हे
ल्यास सुचवि
नृपनीतीची व
सगिकडे कोटें
रांचा मुख्य हे
असा सर्वस्वी
रतीला पाया
न्यायनीतीची
संपादक तुरु
पुढें यतो
खटला करण
असेल यांत
अशा चीडवे
सूड उगविण
आहे असा
काय? उलट
भावाचें जास
चिडण्याची
द्वी अशा
विण्याचे प्रय
नीय नव्हे व
अजागळ अ
कीं का वेळ
पहतां विना
होतील. आ
मनुष्यप्राणानें
पौर्वात्य को
जरी साम्राज्य
प्रमाणें जिन
वेण्याचा प्र
इश्वरी इच्छा
कधींही वि
तेजोवान दे
मनुष्य प्राण
बदारी ओळ
सर्व श्रम व
जाज्वल्य नीत
लावून न
परायण लोक
नीती कळत
उलट त्याच
स्वतः आपल
पण त्या
अतिक्रम

...त्यांच्या बुद्धीला
...पाठीं ब्रह्मराक्षस या
...सन्यास केलें तसेंच
...अशा भीतीनें त्यांना
...क्षणी त्या हृद्रोगांतून
...प्रत्यक्ष स्वर्गीय धनंवतऱ्यांच्या
...णें कठीण पडतें. हा हृद्रोग
सर्वदा मन साशंक असतें.
आपलें कर्तव्य बजावीनासा
...सर्व आचरण मनुष्यपणाला
...रखें करणारें होऊं लागतें. याप्रमाणें
...य रोगाची मीमांसा आहे. त्याला
...ध नाहीं. अशा दुर्धर रोगानें पछाड-
...त्यांपासून आपला बचाव करण्याचें ज्यांच्या
...शीबी आलें असेल त्यांची स्थितिही तित-
...च अनुकंपनीय असे. आपल्या कोणत्या
...तीमुळें संशय रोग जडावेल आणि कोण-
... कृतीमुळें त्याला विपरीत स्वरूप येईल
...ची चिंता करतां करतां विद्वान्यांचे मेंदू
...शक्त होऊन जातात असें संशयग्रस्त
...स्ते ... सत्वहीन झालेत यांचा व्यवहार
...शा ... होत असे हें निदान आह्मा
...दुस्थ ... लोकांस जरी नुसत्या कल्पने-
...रून ...ण्याचें मुळीच कारण नाहीं.
...ध्यां ...हिंदुस्थानांत पसरत असलेला असंतोष
...राज ...येपर्यंत राजद्रोह बनणें अशक्य
...हे. ...रोग नव्हे, नुसती अशक्तता
...हे. ...बत्तीसारखे जालिम उपाय
...र्द ...रूपांतराठायीं होत त्यामुळें उलट
...शक्त ...दो रोगा... येण्याची मात्र
...ही ...आत ही ...अशक्तता परस्परा-
...ब्बो ...दोन कारणांनीं उत्पन्न झालेली
...हे. ...रला व्याय... नाहीं त्यामुळें
...यकर ...अन्न ग्रहण करण्याची जठराला
...नता नाहीं. आणि ... कांहीं अन्न ग्रहण
...ळें जातें तें योग्य व्यायामामुळें पचून
...के पेण्याला वाव नाहीं. त्यामुळें तोंड
...बस्या ...मारप्रमाणें दोहीं बाजूंनीं
डामोरा झालेला आहे. हिंदुस्थानाला
...द्रोहाचा रोग न जडण्याला एकच मार्ग
...हे आणि तो जालीम रेचक देणें हा
...न पथ्यकर अन्न व तें पचविण्यासाठीं
...र तो व्यायाम हा आहे. पथ्यकर
...ची तरतूद लोकांकडून होत आहे पण
पचविण्याला व्यायाम पाहिजे. त्याची
करणें सरकारच्या स्वाधीन आहे. ती
...तीं केली ह्मणजे हिंदुस्थानाला राज्यद्रो-
...पीं रोग जडावयाचा नाहीं. लोकांत
...द्रोह उत्पन्न केल्याबद्दल वर्तमानपत्रांवर
... करावयाचें कारण उरणार नाहीं.
संपादक तुरुंगांत गेल्यावर त्याचे जागीं
... येऊन हज... होते ह्मणून चीड
...चें प्रयोजन राहणार नाहीं. आणि
करितां सरकारास सर्वांना वेठीस धरून
...ा तोंडाला मुसकीं घालण्याचें आतिनिंद्य
करावें लागणार नाहीं. स्वतःच्या
...ची आणि जीवाची पर्वा जेथें लोक
...तनासे झाले तेथें निर्जीव पैशाची
कथा! सरकारांत अमानत ठेवलेली
राजद्रोहाचा खटला उभा राहिल्या-
बुडूं लागली तर त्याची क्षिति कोण
...ल! एरव्ही लोकांकडून सरकारांत काय
पैसा जमा होत आहे? तो सर्वच
...या कल्याणाकडे ईश्वराला स्मरून खर्च
आहे कीं कसें हें ...रस्परांस चांगलें

माहित आहे. त्यांतच याही पैशाची भर पडेल. त्याबद्दल काळजी करून काय उपयोग! छापखाने जप्त होतील, पण तीही आपत्ति वरच्याच वर्गातली. एक निर्जीव छापखाना बंद झाला तर त्याच्या मागें किती सजीव छापखाने निर्माण होतील याची कल्पना असती तर असला अदूरदृष्टीचा विचार निघाला नसतां. मग कोणकोणता ह्मणून छापखाना जप्त होणार! इतक्यावर गोष्ट येऊन ठेपल्यावर ह्मणजे हिंदुस्थानांतील प्रत्येक मानवी अंतःकरण हें छापखाना झाल्यावर राजद्रोहाचा नायनाट खास होईल!

## हितशत्रूंच्या जाळ्यांत सापडूं नका!

सुरतेस राष्ट्रीय सभेच्या कामांत जो बखेडा उत्पन्न झाला त्यामुळें अनेक प्रकारचे विचार मनांत उत्पन्न होतात. या बखेड्याचा परिणाम काय होणार या विषयीं प्रत्येकजण आपआपल्या ठिकाणीं साशंक आहे. अशा वेळीं राष्ट्रीय सभेचे मित्र व तिचे शत्रू यांचे या संबंधांतील विचार पहाणें अवश्य आहे. त्यांतून शत्रूचे बोल तर प्रथम बारकाईनें पाहिले पाहिजेत. यासाठीं राष्ट्रीय सभा स्थापन झाली तेव्हां आणि सध्यां तिच्या कामांत तात्पुरतें विघ्न आलें आहे अशा वेळीं त्यांनीं कसे विचार प्रकट केले आहेत ते आजच्या या लेखांत पहाण्याचें योजलें आहे. सन १८८५ मध्यें राष्ट्रीय सभेची पहिली बैठक झाली तींत हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची तपासणी करण्यासाठीं एक बादशाही कमिशन नेमण्याविषयीं सुचविण्यांत आलें, स्टेट सेक्रेटरी यांचे कौन्सिल कमी करण्याविषयीं विनंती करण्यांत आली होती, कायदे कौन्सिलांत निवडून आलेल्या प्रतिनिधींची संख्या वाढवून त्यांची सुधारणा करावी असें मागणें करण्यांत आलें होतें, आणि सिव्हिल सर्व्हिसची परिक्षा हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें एकाच वेळीं घेण्यांत यावी व लष्करी खर्च कमी करावा अशा सूचना करण्यांत आल्या होत्या. उत्तर ब्रह्मदेश खालसा केल्याबद्दल एका ठरावाचे रूपानें निषेध प्रदर्शित करण्यांत आला होता. पहिल्या बैठकींत जें कांहीं काम झालें तें येवढेंच. पण त्यावरून फार मोठें रण माजलें. विरुद्ध पक्षांकडून मोठ्या आवेशानें आणि बऱ्याचशा मत्सर बुद्धीनें टीकेचा भडिमार झाला. या कामांत आतां प्रमाणेंच तेव्हांही लंडनच्या टाइम्स पत्रानें पुढाकार घेतला होता. त्याचे त्या वेळेचे उद्गार असे आहेत; 'या ठरावांत ज्या प्रकारचें स्थित्यंतर घडून आणण्याविषयीं ह्मटलेलें आहे त्याला अवश्य ती तयारी हिंदुस्थानची झाली आहे कीं काय हा पहिला प्रश्न आहे. या प्रश्नाचे अस्तिपक्ष उत्तर येणें शक्य असल्यास ब्रिटिश सत्तेची घटका भरलीच ह्मणावयाची. हिंदुस्थानांतील लोकांना स्वराज्य चालवितां येतें असें आहे तर आह्मी कशासाठीं तेथे थांबावें! या नव्या पद्धतीची नीट जुळवाजुळव करून द्यावी आणि नंतर रामराम ठोकावा. येवढेंच आमचें काम राहिलें आहे. आमच्या जागीं वकील, शाळामास्तर व वर्तमानपत्रांचे संपदाक येतील आणि आमच्या मदतीशिवाय काम चालवितील. हिंदुस्थानची ज्यांना चांगली माहिती आहे त्यांनाच या स्थित्यंतरांतील अशक्यता दिसून येईल. राष्ट्रीय सभेच्या ठरावांवरून या खेरीज दुसरी कोणतीही गोष्ट दिसून येत नाहीं. या ठरावांप्रमाणें खरोखरच घडून आलें तर हिंदुस्थान सरकारच्या शिरावर असलेल्या कर्जाच्या बोजाखेरीज आपल्या हातीं दुसरें कांहीं लागावयाचें नाहीं! राष्ट्रीय सभेनें केलेल्या ठरावांचा जो मतितार्थ वर दिला आहे त्यांत ब्रिटिश सत्ता घालवून देण्याचा रोख कसा काय दिसून येतो त्याचा खुलासा करणें आमच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. हे राजश्री पुढें ह्मणतात, 'कांहीं झालें तरी हिंदुस्थानची राज्यव्यवस्था सनदशीर होणें नाहीं. राजकीय हक्कांचा पूर्णपणें उपभोग घेतां येत नाहीं ह्मणून सुशिक्षीत वर्ग टीका करो. ते जसजशी योग्यता दाखवितील तसतसे त्यांना कांहीं राजकीय अधिकार दिले जातील. पण हिंदुस्थानचें राज्य तरवारीच्या बळावर मिळविलेलें आहे आणि ते कोणाच्याही हातीं राहिलें तरी त्याचा संभाळ तरवारीच्याच जोरावर करण्यांत आला पाहिजे. आह्मी येथून निघून जावयाचे असलों तर आमच्याहून जास्त करम बहादराच्या किंवा व वक्त्याच्या हातून नव्हे तर आमच्यापेक्षां शस्त्रास्त्रांनीं भारी अशांच्या हातून पराभव पावला.' राष्ट्रीय सभेला सुरवात झाली तेव्हां तिच्यावर अशा प्रकारच्या आगीचा वर्षाव झाला होता. सध्यां जहाल पक्षां संबंधानें जी भाषा वापरलेली कोठें कोठें दृष्टीस पडते ती राष्ट्रीय सभेसंबंधानें त्या-वेळीं वापरण्यांत येत असे. पण अशा दरडावणीला दाद न देतां राष्ट्रीय सभा आपला मार्ग आक्रमूं लागली. आज तेवीस वर्षें तिनें कायदेशीर चळवळीचें काम सतत चालूं ठेवलें आहे. आणि आतां पूर्ण तारुण्याच्या भरांत येण्याच्या समायास तिला असा धक्का बसलेला आहे. हा धक्का किती खेद आणि उद्वेगजनक आहे! सर्वांत जास्त दुःखाची गोष्ट ही कीं राष्ट्रीय सभेचे हितशत्रू ज्या करितां आजपर्यंत सारखे खटपट करीत आले आहेत तोच परिणाम कांहीं पुढाऱ्यांच्या सदिच्छेनें कां होईना पण घडून आला आहे. द्वैत उत्पन्न करून दोघांच्याही डोक्यावर नाचण्याची कल्पना हिंदुस्थानच्या व्यवहारांत अगदीं अज्ञात नाहीं. राष्ट्रीय सभेच्या भक्तामध्यें एकमेकांविरुद्ध असे तर उत्पन्न झाल्यामुळें आमच्या शत्रूंना आनंदाचें मोठें भरतें आलें आहे. राष्ट्रीय सभेंत दुफळी माजविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनीं सध्यां मोठी हातचलाखी करून आपलें कार्य झालें असा बहाणा केला आहे. आणि मुख्य भीति येथेंच आहे. नेमस्त आणि जहाल या शद्बांचा दुरुपयोग करून त्यांचें द्वैत वृद्धिंगत करणाऱ्या या परदेशीय लोकांनीं मोठ्या युक्तीनें आपला डाव टाकला आहे. पण ती त्यांची युक्ती निष्फळ करणें आमच्या हातीं आहे. जहालपक्ष, राष्ट्रीयपक्ष, टिळकपक्ष, वगैरे सर्व पक्षांना सरसकट एका माळेंत काढून त्यांच्या विरुद्ध नेमस्त पक्षाला चिडाविण्याचा उपक्रम करण्यांत आला आहे तो अत्यंत घातक आहे. हिंदुस्थानांत वास्तविक पहातां एकच पक्ष आहे आणि तो राष्ट्रीय पक्ष हा होय. या पक्षांत सर्व राष्ट्र भक्तांचा समावेश होतो. हिंदुस्थानच्या कल्याणाची यत्किंचित तरी क्षिती बाळगणाऱ्या प्रत्येक हिंदी मनुष्याचा पक्ष राष्ट्रीय हाच आहे हें कोणी-ही कधींही विसरतां कामा नये. वर जे दोन चार पक्ष ह्मणून सांगितलें त्या सर्वांचा या राष्ट्रीय पक्षांतच अंतर्भाव होतो. त्यांपैकीं कोणताही पक्ष राष्ट्रीय पक्षांपासून वेगळा नाहीं. सर्वांचे सर्वच विचार एक नसले तरी सर्वांचें अंतिम एक आहे. ह्मणून या एका अंतिमाच्या पायावरच त्या सर्व पक्षांची उभारणी झालेली असल्यामुळें त्यांना भिन्न मानतां येत नाहीं. अशी वस्तुस्थिति आहे तरी आमच्या शत्रूंचा कावा या स्थितीचा विपर्यास करून राष्ट्रीय पक्षांत द्वैत उत्पन्न करण्याचा आहे. हा त्यांचा प्रयत्न खरोखरच राष्ट्रीय पक्षाचा घात करण्यास कारणीभूत होऊं नये अशी प्रत्येक राष्ट्रभक्ताची अतःकरण पूर्वक इच्छा असली पाहिजे. आमच्या शत्रूकडून पूर्वीप्रमाणें धमक्यांच्या ऐवजी गुळचट थापा ऐकावयास मिळाल्या. तरी त्यामुळें कोणाच्याही तोंडास पाणी सुटतां कामा नये. येवढेंच सध्यां सुचवावयाचें आहे.

## संरक्षण

पोलिसांच्या अब्रूला व इभ्रतीला जपण्याची आवश्यकता बगाल सरकारास अलीकडे विशेष वाटूं लागली आहे. कायद्याचें उल्लंघन होऊन समाजांत बेबंदशाई माजूं न देण्यासाठीं नेमलेल्या लोकांनीं स्वतः आपलें वर्तन किती चोख ठेविलें पाहिजे याची कल्पना ज्यांना असेल त्यांच्या इभ्रतीला कमीपणा येण्याची मुळींच भीति नाहीं. बंगालच्या ले. गव्हर्नर साहेबांस आपल्या प्रांतांतील पोलिसांच्या इभ्रतीविषयीं मोठी काळजी लागून राहिली आहे यावरून आपली इभ्रत आपल्या हातानें राखून घेण्यास ते असमर्थ आहेत कीं काय अशी शंका उत्पन्न होणें सहाजिक आहे. फौजदारी खटल्यांत निकाल देतांना न्यायाधिशांस पोलिसचें अयोग्य वर्तन दिसून आल्यास त्याचा निर्देश ठरावांत करण्याची सध्यां वहिवाट आहे; ती बंगाल्यांतील पोलिसांस असह्य होऊं लागली होती असें दिसतें. यावरून निदान येवढें तरी सिद्ध होतें कीं अलीकडे बंगाल्यांतील पोलिसांस न्यायाधिशाकडून बराच आहेर करण्यांत आला आहे इतक्या थरापर्यंत गोष्ट येण्या इतकी बंगाली पोलिसची अंतस्थिति कुज-लेली आहे ही गोष्ट त्यांच्या इभ्रतीस बळकटी आणणारी खास नव्हे. खुद्द बंगाली लोकांचा अनुभव यांच्याही पलीकडचा आहे. कलकत्त्याच्या बीडन स्क्वेअर मधील सभात झालेल्या दंग्यांच्या प्रकरणांत पोलिसांच्या अपराधांवर पांघरूण घालण्याचा कितीही अट्टाहास करण्यांत आला असला तरी कलकत्त्याचे पोलिसांनीं आपल्या विषयीं लोकांच्या मनांत अत्यंत तिरस्कार उत्पन्न करून घेण्याचें श्रेय संपादलें आहे. या विषयीं शंका उरत नाहीं. त्यांत आणखी न्यायाधीशांकडून होणाऱ्या खरमरीत टीकेची भर पडल्यामुळें बंगाल्यांतील पोलिसांस तोंड काढावयास जागा नाहींशीं झाली असल्यास नवल नाहीं. अशा कठिण अवस्थेंत सांपडलेल्या पोलिसांचे कैवारी बेकेवर धांवून

## नोटीस

नोटीस हरी वा थोंडी कैकाडी मुक्काम नांदखेड तालुके बाळापूर यांस:—

नोटीस देणार रामप्यारी मर्द मुळचंद आ. पा. करणार सासरा घासीराम लच्छीराम मारवाडी रा. मलकापूर तालुके मजकूर कारणें नोटीस देण्यांत येतें कीं मौजे दादुलगांव ता. बाळापूर येथील सर्वे नंबर ३३ एकर १०-२६ आकार रुपये १८ चें सालीम शेत बरेंच दिवसापासून तुह्मी पट्यानें वहात असून नफ्याचे रुपये गेल्या सन १३१७ फसली सालचे रुपये ४१ हे तुह्मी आज पावेतो दिले नाहीं. त्याप्रमाणें सालबंदीचें पुरज्यांतील ठरावाप्रमाणें सालबंदीचे रुपये १०० ची याचा करारही पुरा झाला असून दिलें नाहीं. या करितां नोटीस दिली आहे. ही नोटीस पावल्यादिवसापासून ८ दिवसांचे आंत नफ्याचे रुपये ४१ सालबंदीचे रुपये १०० शंभर एकूण रुपये १४१ देऊन पावती घ्यावी. पुढें सदरहु शेत तुह्मी वहित करूं नये कारण शेत दुसऱ्यांस वाहण्यास दिले आहे. करितां शेतांत जावूं नये व कोणास हरकत करूं नये जर तुह्मी हरकत केली तर तुमचेवर फौजदारींत फीर्याद करूं व त्याचा आणि रुपये न दिल्यास त्याचे फिर्यादीस दिवाणी कोर्टांत जो खर्च होईल तो सर्व नोटीशीचे खर्चा सुद्धां तुमचे पासून भरून घेतला जाईल करितां अगाऊ कळविलें आहे तरी मुदतींत आपसांत निकाल करावा. कळावें. तारीख २९-४-०८ इ.

सही मारवाडींत )
रामप्यारी मर्द मूलचंद
दस्तुर सासरा घासीराम
लच्छीराम

नं. ख. ६१

## नोटीस

## नोटीस

नोटीस वेशमी— जयराम वल्लद मकाजी व बळीराम वल्लद जयराम घीटे रहाणार अडगांव ता० दर्यापूर पोष्ट सुर्जी अंजनगांव यांस:-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी नामे जुगली मर्द बळीराम ही १ नंबरची असून व २ नंबरची लग्नाची बायको आहे. तिस तुह्मी अंदाजा दोन अडीच महिने झाले अंगावरील सर्व दागिनें काढून घेऊन एका महारावरोबर पाठवून दिले यानंतर [illegible] कडे मुलीला कां पाठवून दिले [illegible] विचारण्याकरितां आलो अ[illegible] कांहींएक न सांगतां मुली[illegible] नाहीं असें सांगितलें व मी फारकती मागितली असतांना आपण एक महिन्यानें फारकती देईन असा कराराचा कागद लिहून दिला. त्यानंतर पुन्हा त्या मुदतीच्या सुमारास आह्मी आलो असतांना आपण उडवाउडवीचीं उत्तरें देऊन आपण फारकती दिली नाहीं. सबब या नोटिशीनें आपल्यास कळविण्यांत येतें कीं नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आपण जुगली मर्द बळीराम इजला नीट रीतीनें वागवाल अशी पंचाची खात्री करून देऊन नांदण्यास घेऊन जावें ती नांदण्यास तयार आहे. असें जर मुदतींत झालें नाहीं तर हीच नोटीस फारकत असें समजून दुसरा घरठाव करून देईन मग तिच्यावर आपला कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाहीं कळावें. ता. २६-४-०८

सही
धनसाजी वा मानसींगजी राहणार
धामणगांव तालुके आकोट
दस्तुर खु०

नं. ख. ६६

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७

भांडवल एक लक्ष रुपये.

प्रत्येक भाग २५ रुपयाचा

याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या कारितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रयेक महिन्यांला रु. ५ प्रमाणें पुरी करून दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरंडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन अकोला येथें सदर कंपनीचे आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील

बोर्डाच्या हुकूमावरून

पी. सी. जोगळेकर
आणि कंपनी
म्या. एजंटस्


नं. १३

## नोटीस

नोटीस भीमाई मर्द गोपाजी जात कुणबी रा. बाळखेडे प्रगणे वाकद ता. वाशीम इजला खालीं सही करणार ह्यांचे कडून नोटीस देण्यांत येते कीं तुं माझी सख्खी चुलती आहेस माझा चुलता मरण पावल्यास सुमारे ९-१० महीने झाले त्याची सर्व स्थावर जंगम इस्टेट ... मी कायदेशीर ...

दोन घड्याळें एकदम बोलविणाऱ्यास पोस्ट खर्च माफ.

गजकर्णाच्या २४ शिशया बोलविणाऱ्यास रा. सिस्टम घड्याळ बक्षीस सखली मुधां दर शिशीस ।.



रासकोप सिस्टम किं. रु. ३। स्वदेशी पेटेंट वाच किं. रु. ५। सहा हिरे वाली रु. ४। आठ दिवसाच्या किल्लीचें खिशातील घड्याळ रु. १४ सोलजर वाच मजबुत रु. ५। स्वदेशी सेकंड वाली रु. ६ पोस्टखर्च ।-

के. नुरा. आणि कं.
मुंबई पोस्ट नं. ९

नं. ४७

त्वरा करा! त्वरा करा!

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतिनें शिकविले जाईल दर माफक असून वकशिर काम केलें जाईल आजवर ५०० चे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व वग खर्च ...

## नोटीस

१ रामजी वा येदूजी पाटील
१ शेख वजीर वा शेख भामी
१ भद्रभान वा कुकाजी पाटील
१ गुलव्या वा मोहन्या पारधी
१ आसरु वा कडतु पाटील
१ मारोती वा चतरु पाटील
१ महमद हयात वा शेख भाऊ
१ बापु वा परशराम पाटील
१ गणू वा जानु पाटील

.. राहणार अडगांव बु० जाहगीर तालुके
..गांव जि० बुलडाणें यांस:--

..ही करणार यांजकडून नोटीस
..ी माझा मैयत भ्रतार गणपत
..ी याचे दुकानेंच जें कर्ज घे-
.. तें वसूल करण्याची मालकीण
..यासाठीं तुह्मास पैसे देणें असतील
.. देऊन माझे स्वदस्तूरची पावती
..ाणें न केल्यास अगर तुह्मी
..वाय दुसऱ्यास दिल्यास त्या-
.. जबाबदार राहणार नाहीं व आ-
..असलेलें कर्जाउ पैसे व्याजा-
..र्चासुद्धा वसूल केले जातील
..दिली सही ४-१-०८ इ.

सहि

.. मर्द गणपत तर्फे मुखत्यार
नरसिंगराव देशमुख हिंगणेकर
दस्तुर खु.

## नोटीस

..जी वल्लद माहादाजी लोखंडकार
राहणार लोखंडे ता. खामगांव
जि. बुलडाणा

..ी करणार यांजकडून नोटीस
.. माझा मयत भ्रतार
..ी याचें दुकानचें जें

असतील ते मज..
पावती घ्यावी याप्र..
तुह्मी पैसे माझे शिवाय दुसऱ्यास दिल्यास
त्याजबद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व
आमचे घेणें असलेले कर्जाऊ पैसे व्याजा-
सुद्धां वसूल केले जातील. कळावें
ता. ४-१-१९०८ इ.

सही

भुपती मर्द गणपत तर्फे मुखत्यार
नरसिंगराव देशमुख हिंगणीकर
दस्तूर खुद्द

नंबर २९

## नोटीस

तपाजी वल्लद शेवगाजी पाटील राहणार पडके ता. खामगांव जि. बुलडाणा यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा भ्रतार मैयत गणपत वल्लद रंगाजी यांचें दुकानचें जें कर्ज घेतलें असेल तें वसूल करण्याची मालकीण मी आहे यासाठीं तुह्मास पैसे देणें असतील ते मजपाशीं देऊन माझे स्वदस्तुरची पावती घ्यावी याप्रमाणें न केल्यास अगर तुह्मी पैसे माझे शिवाय दुसऱ्यास दिल्यास त्याज बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व आमचे घेणें असलेले कर्जाऊ पैसे व्याजासुद्धां कोर्ट खर्च्यासुद्धां वसूल केले जातील ही नोटीस दिली. कळावें ता० ४-१-०८ इ०

सही

भुपती मर्द गणपत तर्फे मुखत्यार
नरसिंगराव देशमुख हिंगणेकर
नंबर ३३ द० खु.

जा..

देण्यांत येते कीं आपण ..
नाहीं लागून आपल्या मालकीच..
टाकणार अहां असें समजतें. ह्मणून ..
शीनें आपणास कळवितों कीं त्या शेतावर
असलेलें गोविंदा पाटील यांचें कर्ज मी फेडून टाकतो. व इतर आपणास आजवर जें कर्ज झालें आहे त्याचाही बोजा मी उचलतो. व आपण माझ्या घरीं येऊन रहावें. असें झालें ह्मणजे आपणास कर्ज काढण्याची व शेत विकण्याची गहाण अगर पट्टानें देण्याची जरूर नाहीं. ह्या प्रमाणें न करतां आपण शेत विकाल गहाण बक्षीस अगर पट्यानें द्याल तर त्याचा बोजा शेतावर व माझ्यावर नाहीं तर देवघेवीचा बोजा बद्दल आपण व देवघेव घेणारा हेंच जबाबदार रहाल कोणाचें नुकसान होऊं नये ह्मणून अगाऊ सुचना केली आहे. कळावें ता. २९-१२-०७ इ.

सही

बापुन्या वा॥ हरी महार
राहणार दहिगांव
नं. ११ निशाणी खुद.

## नोटीस

पाटील..
तालुके..
खा..
देण्यांत..
कहू..
मु..

किं..
आमचक..
अगरचे तुमचे ..
नोटीस पावल्या पा..
छापखान्यातून आह्मास..
तसें न केल्यास तुह्मी..
किंवा आज तारखेचे पु..
इकडे काढलें ते आह्मी..
ही नोटीस पावल्या पासून..
आंत आमचे नावाचे सही..
जवळ आहे ते आमचे ..
देणें व आमची नांवाची ..
घेणें तसें न केल्यास रितीप्र..
केली जाईल कळावें ता. २-..

सही

रामजी मा..
नं. १४

## नोटी..

सर्वत्र शेट सा..

...ळ आनररी असिस्टंट सर्जन
...नी आमची ओषधें बरक इनें
...ुच्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत,
...रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट
...श्य लक्षांत ठेवावें.

...त्रिचा औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास
... तर पैसे परत देउनही त्याचें आरोग्यार्थ आणखी एखादे
...ास तें फुकटही देउं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं
...हे.

## मदनामृत संजविनी

...र्धक. अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्य स्तंबक,
...कशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

...ळ मुख्य राजा जी धातू ती शुद्ध असेल तरच शरिर निरोगी
...ख्य प्राप्त होते. ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे
उत्पन्न होऊन शारिरीक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणा...
धातू शुद्ध व पुष्ठ होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे
एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरिर रोगरहित होऊन सौख्य
अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनाने नपुसकत्व, स्वप्नजन्य
...न्ह के इंद्रियशिथलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विका...
...ळपणा, स्त्रियांची घपणी. छातिंतील ...

... जो तो पुढे येउं पाहत आहे.

... व आळशी बनल्यामुळें एका जो धंदा सुरूं
... हुबेहुब नक्कल करून पाहिजें त्यानें करावें आमचे
जाहिरातीस कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून
आमच्या आंजिलें वगैरे गावांतून तो पूर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन
जाहिराती सुरूं होत आहेत. अशा जाहिराती किंवा तें लोक याची आह्मास
निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी
गाण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा
कारखाना आज सतत १५।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास
थोरले डाक्टरांनी सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधींनें कित्यावधी ग्राहक रोग
मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचीच औषध नेहमीं उपयोगांत आणणें
अत्यंत हितकारक आहे यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी
आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करतां अशाच रीतीनें
कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय
नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेंस आणण्याची खटपट करूं.
पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्य
व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यासआमचींच
अत्यंत गुणकारक आहेत. तीच सर्वांनीं वापरावा, एकवार अनुभवानेंच
होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत
औषध मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरी गुण...
औषध मिळून हटकूण व त्वरित आरोग्य येईल. नं.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरि**


# Ociental Goernment Security Life Assursnc...

# Company Limited

*Established* 1874.

*HEAD OFFICE*—**BOMAY**

Chief Agency for C. P. Berar and Khandesh

*Head—Quarters—Nagpur C. P.*

## FUNDS EXCEED TWO CORR...
## AND SEVENTY FIVE LAKHS

...s paid for over two Crores

**...E SETTLNT OF MEENT CLA...**

हे त्यां... ...वारस आहे. तूं दुसरा नवरा करून जाणार आहेस असें कळलें. तुजला तुझे हयाती पर्यंत फक्त अन्नवस्त्राचा अधिकार आहे. व मी तुजला अन्नवस्त्र देत आहे. तुजला सदरहु इस्टेटीची कोणत्याहि प्रकारची अफरातफर करण्याची अगर दुसऱ्याकोणास खरेदी गहाण देण्याचा कोणत्याही प्रकारचा अधिकार नाहीं सदरहु इस्टेटींवर दुसऱ्या कोणाच कर्ज वगैरे कांहीं नाहीं करितां तुजला या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं सदरहु इस्टेटीची कोणत्याहि प्रकारची अफरातफर करूं नयेस जर करितां कांहीं अफरातफर करशील तर रीतीप्रमाणे तजवीज केली जाईल कळावें. ता. २२-४-१९०८ सही

बापोचननं:— सखाराम जान बोडखे कुणबी रा. बाळखेड ता. वाशीम.

...— गोडाजी वल्हद दे...जी गाय/ल्वाड रा. बाळखेडे ता. वाशीम.

सखाराम बाळाजी गाईकवाव

केर... ...जास्त. सायकली ही। दुरुस्त मिळतील. ... नवीन सायकली विकत ...

चालक.

सायकल - मिस्तर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा नं ४८ ई. ७ आकोला (शहर)

---

## देशी दवाखाना

### (वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर यांचा

आम्ही आमचा दवाखाना पुन्हा चालू केला आहे. शास्त्रोक्त रीतीनें औषधें तयार केलेलीं असतात. चिकीत्साहि काळजी पूर्वक होत असते हें सर्व श्रुतच आहे. रजू लोकांनीं अनुभव घेऊन पाहावा. भस्म, मात्रा, पाक, गुटिका, वगैरे विक्रिस तयार आहेत. गरमी, उपदंश, प्रदर, धुरणी, बाळंतरोग, पंडु इत्यादि कष्टसाध्य रोग फार लवकर दूर होतात.

पत्ता— वैद्य शिवचरणगीर रामगीर कुरणखेडकर आकोला येथें शहरात मुलीचे शाळें जवळ

चैत्रशुध प्रतिपदा शके १८३० आकोला

नोटीस केशमी भीवा वल्द
नात कैकाडी राहणार ... पो.
आकोला ता. आकोला

यास —

नोटीस देणार सोनी मर्द भीवा कैकाडी राहणार खामगांव नोटीस देण्यात येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज तीन वर्षे झाली मी आपले आई बापाचे घरीं आहे तुम्ही मजला नेत नाहीं वरून मी लोकांचें कर्ज रुपये १५० काढुन आजपावेतों निरवाह केला आतां कोणी कर्ज देऊं शकत नाहीं व मी अशी कीती दिवस राहावें कारितां नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत कर्जाचे रुपये देऊन मजला घेऊन जावे मी येण्यास कबुल आहे अगर तसें तुम्ही न केल्यास मुदतींत फारकत द्यावी मुदतींत तुमचेकडून अमल न झाल्यास हिच फारकत समजुन मी दुसरा घरठाव करीन मग मात्र तुमची जबाबदारी राहणार नाहीं या नोटीशीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल ही नोटीस दिली. कळावें ता. २५-४-०८ इ.

सही

सोनी मर्द भिवा कैकाडी राहणार
खामगांव नि. हातची बां...

## नोटीस

चि. तुळशी मर्द गोविंदा कुणबी रा. शेगांव ता. खामगांव ईजला खालीं सही करणार इचे कडून नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं मी जेलमधून नागपूर हायकोर्टांत धर्म अपिल केलें आहे व त्या अपिलांत माझा बचाव करण्यासाठीं माझ्या इस्टेटी वर कर्ज वगैरे काढण्यासाठीं मी तुजला ता. २२-४-१९०८ ईसवी रोजीं जनरल मुखत्यार पत्र जेलांतून दिलें आहे त्या मुखत्यारपत्रावें आधारें तूं कांहीं मला सोडविण्याची खटपट केली नसून मला असें कळतें कीं मला फसवून माझी स्थावर इस्टेट तूं विकून दुसरा नवरा करण्याचे विचारात आहेस या साठीं या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुजला वरील तारखेस दिलेलें मुखत्यारपत्र रद्द केले आहे व मु... जे व्यवहार केले... आहेत ही नोटी... १९०८

सही

भीमा ... शेगांव
हल्ली ... नि.

नं. ब. १७

...त

... गांवंडें रा० नागापूर ता०
बुलडाणें यांसः—

...ही करणार यांजकडून नोटीस
... माझा मैयत भ्रतार गणपत
... याचें दुकानचें जें कर्ज घे-
... वसूल करण्याची मालकीण
...साठीं तुह्मास पैसे देणें असतील
...ऊन माझे ...
...
... कर्जाउ पैसे व्याजा-
...र्चासुद्धा वसूल केले जातील
...दिली सही ४-१-०८ इ.

सही

... मर्द गणपत तर्फे मुखत्यार
नरसिंगराव देशमुख हिंगणेकर
दस्तुर खु.

## नोटीस

...बा शामजी काळे रा० अंत्रज
... जि. बुलडाणें यांसः—

...ही करणार यांजकडून नोटीस
... कीं माझा मयत भ्रतार
... गंगाजी याचें दुकानचें जें
...असेल तें वसूल करण्याची
... आहे यासाठीं तुह्मास पैसे देणें
... समजपाशीं देऊन माझे स्वदस्तूरची
... याप्रमाणें न केल्यास अगर
...झे शिवाय दुसऱ्यास दिल्यास
... जबाबदार राहणार नाहीं
...घेणें असलेले कर्जाऊ पैसे
...कोर्ट खर्चासुद्धां वसूल केले
...ळावें ता. ४-१-१९०८ इ०

## नोटीस

१ राजेश्वरराव रंगराव देशपांडे राहणार बाळापूर ता. बाळापूर जिल्हे आकोले.

यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा भ्रतार मैयत ... वल्लद गंगाजी यांचें दुकानचें ... घेतलें असेल ...
...ती
... अगर तुह्मी
... माझे शिवाय दुसऱ्यास दिल्यास त्याज बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं व आमचे घेणें असलेले कर्जाऊ पैसे व्याजासुद्धां कोर्ट खर्च्यासुद्धां वसूल केले जातील ही नोटीस दिली. काळावें ता० ४-१-०८ इ०

सही

ध्रुपती मर्द गणपत तर्फे मुखत्यार
नरसिंगराव देशमुख हिंगणेकर

नंबर ४१ द० खु.

## नोटीस

नोटीस बेरामी मीर समशोद्दीन पाटील मौजे बोथ तालुके खामगांव जि. बुलडाणें

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझे दुकानची बाकी तुमचेकडेस आहे ती तुह्मी समजवळ देऊन माझे सहीची पावती घ्यावी मला से... बाकी कोणास देऊं नये ...
...बाबदार नाहीं. त्या म...
मालकीण मी आहे. ही...
तारीख ४-१-०८

ध्रुपती मर्द गण...
नं. ३९ नरसिंगरा...

## न...

नोटीस मारोती बा... वाहळ खुर्द ता० खा...

खालीं स...
...येते
...आस
... तारीख
स...

ध्रुपती मर्द गणपत तर्फे
नरसिंगराव देशमुख

नं. २७ द०

## नोटीस

नोटीस भगवंतराव रा० मौजे वाह... ता. बाळापूर जि० आकोलें

खालीं सही करणार इजकडून ने... ण्यांत येते कीं माझें पेव तुमचे येथें ... तें पेव तुह्मी माझे परवानगी वांचून काढूं देऊं नये ही नोटीस दिली ४-१-०८ इ०

सही

ध्रुपती मर्द गणपत तर्फे
नरसिंगराव देशमुख

नं. २८

## नोटीस

नोटीस बेरामी पुनी मर्द गण...

…हे जानेवारी

सही
…शाणी रेव मोना-
…लद चींधाजी ताथोड
…हणार मंडाळे तालुके
आकोले याचे हातची
असें.

…मजी वल्लद दगडाजी
घोगरे राहणार
मंडाळे द. खु

## नोटीस


…मारोती ढोरे व बळी-
…ती ढोरेगोदर राहणार
यांस:—
…रणार यांजकडून नोटीस
तुमच्या व आमच्या
माझा निम्मे हिस्सा आहे.
…णें आहे. कारण माझा
…त गी हिस्सा व घर
…त्या गांवास जातो तर
आपण व्यत्यय आणत
…ा पाडून मागतां लोक त्यांस
मागतात व आपण
…ागतां तर आज्ञास तो
रुपयास विकणें आहे.
…त्यय आणू नये. आण-
व्यवस्था केली जाईल

## पैसे कमविण्याची युक्ती
## वाचा व आपलें हित करा

गजकर्णाचें सोनेरी मलम दर सी. ४ आणे
२४ तासांत गजकर्ण इसब बरेकरणारें औषध

बक्षीस


१२ कुप्या घेणारास १ बर्मा टाईमस बक्षीस
१८ कुप्या घेणारास बर्मा आलारास बक्षीसें
२४ घेणाऱ्यास रासकोप सिस्टम ३। रु. वाले खिशांतलि घड्याळ बक्षीस.
४८ घेणाऱ्यास संगीत गाणारें ६ इंच उंचींचें टिकाउ व मजबूत घड्याळ बक्षीस



रासकोप सिस्टिम घड्याळ इतके कांहीं मजबूत आहे कीं थोड्या किंमतींत मिळून ५-७ वर्षें खुषीनें चालतें कोणाही …कीं इतकी स्वस्त घड्याळें विकण्याचो
…घड्याळाची किंमत
…बक्षीस मिळणारें
…टी व साखळी
…बरोबर इनाम

…कदम घेणाऱ्यास
…लेल हाणजे ७

## कडबा तोडण्या…



सावकार—राम्या हीच कां कामाची रीत!

राम्या—काय झालं ?

सावकार—झाले काय! जनावरांची उपास… मार झाली. सगळ्यांच्या पु… कडबा तोडून बारीक करून क… घातला नाहींस?

राम्या—सावकार, कुऱ्हाडीनें किंवा क… त्यानें कडबा तोडून आमच्याच्या… २०-२५ गुरांना घाल… यंत्र आणा, मग घालतो…

सावकार—त्यलारे कसलें यंत्रें! कड… तोडावयाचीं यंत्रें कुठे मिळ… तात ?

राम्या—नाहीं का परव. आमच्या त्या… रामजी पाटलांनीं १० रुपये देऊन बेळगांवाहून किर्लोस्कर बंधूकडून एक कडबा तोडण्याचें यंत्र आणिलय त्यानें कसा अगदीं कडबा कराकर तोडून निधतोपा.

सावकार—बरें तर मीही किर्लोस्कर 'बंधु' बेळगांव यांच्याकडून एक तसलेंच यंत्र मागवितों.

नं. ४५

## जाहिर नोटीस

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

XLII AKOLA MONDAY 20 JANUARY 1908 NO 3

४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार तारीख २० माहे जानेवारी सन १९०८ इ० [ अंक


व्यापार करणारी.

## आणि मंडळी

## ...मिटेड.

...१८८२ च्या सहाव्या
...जिस्टर केली आहे.
...सन १९०७
... लक्ष रुपये.
...ग २५ रुपयाचा
...दर भाग ४०००.
... मिळण्या करितां अर्ज
... भागाबद्दल अर्जासोबत
... मंजूर झाल्यावर रुपये
...क्रम प्रत्येक महिन्यांला रु.
...न दिली पाहिजे.
... मेमोरँडम् व आर्टिकल्स
... आकोला येथें सदर
... पाहण्यास मिळेल.
... सदर्हू आफिसांत अर्ज
...तील.

...बोर्डाच्या हुकूमावरून

## ...गोळकर
## ... कंपनी
## ...एजंटस्

---

... नोटीस.

... सर्व लोकांस कळविण्यांत
...हद्द रामजी माळी रा...
... आमचे दुकानां...
...

---

...जाईल कळावें तारीख १९ माहे १ सन १९०८ इ०

सही
नारायणराव बाबुराव देशमूख तर्फे मुखत्यार तुकाराम खुशाल
नं. ९२ मोरे द. खु

## नोटीस

नोटीस बेशमी— केशव रामकृष्ण पटवारी रहाणार कुरुम हल्लीं जागठी खुर्द ता० मुर्तिजापूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं कजबे कुरुम ता० मुर्तिजापूर येथील तुमचे मालकीचें राहातें घर धाबे चौक खुली जागा मागील व पुढील बखार विहीर चार दिवाली आवरा समेत राहातें घर धाबें व चौक मागे पडीत जागा पूर्वेकडील चवकाचा दरवाजा समोर आंगण व त्यांत विहीर व आसराचा दरवाजा उत्तरेस, यांची चतु सिमा पुर्वेस देवजी माळी मेहेतर याचें घर द० कवठीकर माळी याचें घर प० हनवती मारवाडी व पुंजासा लाड याचें घर उ० सरकारी रस्ता तुह्मी आमच्या... सवदा रुपये पांचशाचा पुष्कळ... पासून इमल्या सुद्धां जा... त्यांत खरेदी सनद... बूकल केलें... देशपांडे... ... हरकत ... तुह्मी खरेदी ...

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण नागेश ब्राह्मण राहणार जामोद ता० जळगांव जि. बुलडाणें यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची मुलचंद गंगाराम मा. धन्नालाल टुकडादास या नांवची पांच दुकानें असून माझे मालक धन्नालाल शेट यानीं तुह्मास मुखत्यार पत्र दिलें असून तुह्मी काम करीत होता त्यांना तारीख २३-१०-१९०७ इ० देवाज्ञा झाली त्यावरही मी तुह्मास तारीख २६-१२-१९०७ इ० रोजीं मुखत्यार पत्र दिलें व तुह्मास लिहिण्याचें वगैरे काम करण्यास सांगितलें असून तें कांहींच केलें नाहीं करितां तुमचे मुखत्यार पत्र आज तारीख १९-१-०८ इ. रोजीं रद्द केलें आहे. करितां आज तारखेपासून आमचे दुकानचे कोणतेच प्रकारचें काम करूं नये. जर कराल तर तुह्मी जबाबदार रहाल व जे दिवसांपासून धन्नालाल शेट यानीं तुह्मास मुखत्यार पत्र दिलें होतें तेंवेळेपासून आज तारखे पावेतों आमचे पांचही दुकानचे कागदपत्र व हिशेब समजाऊन व तुमचेवर आमचे पैसे निघतात ते अदा करून सर्व प्रकारचे कामासंबंधी माहिती करून देऊन आमचे स...ची पावती घ्यावी तरी ही नोटीस पा...सून आठ दिवसांचे आंत सदर्हू काम ...असें न केल्यास कायद्याप्रमाणें तज...ी जाईल कळावें. ता. १९-१-०८

...गणपत गंगाराम

सही

मूलचंद गंगाराम मालक केसरबाई जवजे धन्नालाल नि० खुद
नंबर ९० बांगडी व शिक्का

---

त्यांनी सदर्हू तारखेस आमच... मुक्काम अकोला येथें दिवसा ... हजर व्हावें तसें करण्यास चुकूं नये ... नोटीस आमच्या सहीनिशी व ... निशी दिली असें ता० १७...

N. G. Su...
नं० ९२ सच...

## वर्तमानसार

सर डेन्झिल इबेटसन यांचा आजार पुन्हां उलटल्यामुळें त्यांनीं पंजाबच्या लेफ्टनंट गव्हर्नरच्या जागेचा राजीनामा दिला आहे. ते बहुधां ८।१० दिवसांत विलायतेस जातील.

सर लुई डेन यांस पंजाबचे लेफ्टनंट गव्हर्नर... बातमी सरकारी रीतीनें लव... होईल असा समज आहे.

... यांच्या थडग्यावरील मूखवटा काढू...चा कोणी ... अपमा... होता. लेफटेन... मि. टिकम... एक ...यन यांच्या... क्रुग...चा अपमान केल्याच्या आरोपावरून, खटला झाला होता. परंतु ते सर्व दोषमुक्त ठरले.

ट्रान्सवालांतील मि. रामसुंदर पंडित यांना नांवें न नोंदल्याबद्दल तुरुंगात टाकण्यांत आले होते. ते गेल्या १३ डिसेंबरला तुरुंगांतून सुटले. त्या वेळीं त्यांना मान देण्यासाठीं तुरुंगाभोंवती शेंकडों हिंदुमुसलमान जमा झाले होते. त्यांनीं पंडितजींना थाटांत त्यांच्या घरापर्यंत पोचते केलें. मिरवणूक मशीदीजवळ येतांच मुसलमान मौलवींनीं त्याचें शुभचिंतन केलें. यानंतर मि. पंडितजींचें भाषण झालें. ते ह्मणाले कीं मला मान देण्यासाठीं जो लोकसमूह जमला आहे, व त्यांचेकडून जो मला मान मिळाला आहे, त्याला ... आहे असें मला वाटत...

असा ा नवीन कायद्यासंबंधानें
य थील भाषणांत मि. स्मट्स
मेदभि खुलासा केला आहे कीं,
येथें त आशियाटिक व पुढारी असा
ची च कित्येक करतात पण आमच्या
चा ा प्रकार नाहीं. चळवळे लोकां-
शिया ळवळ बंद होईपर्यंत आमचा प्रस्तु-
वून क्रम आह्मी सोडणार नाहीं. आ-
एक टिक लोकांना अंगठ्याचे ठसे उठ-
अर्थ नांवें नोंदविण्याची पार्लमेंट आणखी
स्तु ा सवड देईल, पण त्याची मुदत
ह ति मर्यादित राहील. युरोपांतले व-
स्थितीविषयीं अनभिज्ञ लोक कांहीं
णालें तरी ट्रान्सव्हाल देश गोऱ्यालो-
कांसाठीं राखून ठेवण्याचा आमचा संकल्प
आहे. असें भाषण एका न्यायप्रिय गोऱ्या-
या तोंडू निघालें हें नवल ह्मणावयाचें.

ता. ४ रोजीं मद्रासचे गव्हनर सर आर्थर लाले यांच्या हस्तें मद्रासच्या व्हेट-रनरी कालेजचा बक्षिससमारंभ झाला. त्या वेळीं त्यांनीं असे उद्गार काढले कीं, इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांतील जनावरांची स्थिति फार वाईट आहे. व याचें कारण योग्य
अभाव आणि लोकांचें दुर्लक्ष
इस आत्मा नाहीं अशीं तत्वें
करणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांपेक्षां
ांतील लोक गुराढोरांची काळजी
अधिक घेतात. परंतु ज्या ठिकाणा
स खावयास पुरेंस मिळत नाहीं
ाणीं जनावरांस पोटभर खावयास
मिळणार!

राज्यक्रांती घडवून आणण्याच्या कामीं
ानुभूती दाखविणाऱ्या सुमारें १०० वर्त-
ानपत्रकारांस रशियांत कैद करण्यांत आले
आहे. व तीच स्थिती हिंदुस्थानास येऊं
ाहात आहे.

मार्कोनिग्राफ पद्धतीनें मंगळाच्या ताऱ्यांवर
काहीं निरोप पाठविण्याचा अमेरिकन शो-
क प्रयत्न करणार आहेत. या कामीं
गणारी विद्युत–शक्ती नायगऱ्याच्या धब-
धब्यापासून उत्पन्न करण्यांत येणार आहे.

क्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचे जे
चालले आहेत त्यासंबंधानें व्हाइसराय
कडे मवाळपक्षाच्या कानव्होकेशननें तार
ली होती. परंतु 'ज्या कायद्यास खुद्द
देवांची संमति मिळाली आहे त्यांत
कांहीं करतां येणार नाहीं, बाकी
णणें राजेसाहेबांस कळवीन,
!) उत्तर मिळालें
ापासून इं

### लोकांचा करारीपण.

वरील शिक्षा सांगण्यांत आल्यावर प्रिटोरिया व जोहान्सबर्ग येथें हिंदी लोकांच्या सभा भरून अमानुष शिक्षा दिल्याबद्दल धिःकार पदर्शित करण्यांत आला व हें भांडण निकारानें पुढें चालविण्याचे ठराव झाले हिंदी लोकांनीं काळीं निशाणें घेऊन रस्त्यातून मिरवणुकाही काढल्या.

### चिनी लोक व चीन सरकार

वरील खटल्यांचे निकाल चिनी लोकांनीं ताबडतोब तारा करून पेकिंग सरकारास कळविले.

### बॅरिस्टर गांधी यांचा उपदेश.

बॅरिस्टर गांधी यांस शिक्षा होण्यापूर्वी त्यांनीं लहानसें भाषण करून ' अपमानास्पद कायद्यास मान वाकविण्यापेक्षां अन्नानें मरण हेंच श्रेयस्कर आहे ' असा आपल्या हिंदी बांधवास उपदेश केला.

### अत्याचार

मैमनसिंग येथील तागाचे व्यापारी मि. चार्लस हाफकिन्स हे नुकतेच येथें आले आहेत. त्यांनीं तेथील पोलीसच्या पुंडाईची हकीकत खालीं दिल्याप्रमाणें सांगितली:— मि. ॲलन यांच्यावर गोळी झाडणाराचा शोध लावून देणारास बक्षीस देण्यांत येईल अशी मैमनसिंगचे कलेक्टर मि. क्लार्क यांनीं जाहिर नोटीस प्रसिद्ध केली होती. तिच्या प्रती बाजारांतील कांहीं इमारतीच्या भिंतीवर चिटकविल्या होत्या त्या लोकांनीं फाडून टाकल्या. गोलंडो येथें अत्याचार घडून आल्यानंतर कलेक्टरांनीं सर्व एतद्देशीय लोकांकडून बंदुका घेतल्या आणि नंतर शहरांत लष्करी पोलीस आणवून त्यांचेकडून तेथील लोकांच्या घरांची झडती घेण्यांत आली. ज्या घरांवरील जाहिराती फाडण्यांत आल्या होत्या त्या घरांचाच झाडा पोलीसनें विशेष कसोशीनें घेतला. झडती घेतांना सामानसुमानाची पोलीसलोक विशेष काळजी बाळगीत नव्हते. या त्यांच्या बेपर्वाईमुळें एका गृह
स्थानें एका पोलिसास बांबूच्या काठीनें ब
चोप दिला. या कृत्याबद्दल सूड घेण्या
पोलिसांनीं सर्व धूमाकूळ माजविला व लो
मारहाण करण्याचा क्रम चालविला. पोलिसां
कित्येक घरांतील मालाची नासधूस केली. लोक भयभीत होऊन ते शहर सोडून जाऊं लागले. सुमारें २०० कुटुंबें दोन दिवसांत शहर सोडून गेलीं व कांहीं
बाहेर झोंपड्या
रेल्वेनें पर

# वऱ्हाडसमाचार

पौष वद्य २ शके १८२९

## औद्योगिक प्रगतीचा आढावा.

सुरत येथें भरलेल्या औद्योगिक परिषदेपुढें गतवर्षींच्या कामा संबंधाचा जो रिपोर्ट त्या परिषदेच्या सेक्रेटरींकडून सादर करण्यांत आला त्यांत त्यांनीं स्वतः केलेल्या कामाची माहिती तर आहेच. पण त्या शिवाय त्यांत एकंदर देशांतील औद्योगिक पुनरुज्जीवनाचें सीमालोचन केलेलें आहे. येवढें काम जरी परिषदेच्या व्यवस्थापकांकडून उत्तम प्रकारें झालें तरी देखील तें थोडें नाहीं. औद्योगिक बाबतींत परिषदेनें नवीन असें कांहीं कार्य घडवून आणलेलें नाहीं खरें, तथापि लोकांना ज्यांची अत्यंत जरूर आहे अशा अनेक महत्वाच्या विषयासंबंधाची माहिती गोळा करून तिचा प्रसार करणें हें सुद्धां बरेंच महत्वाचें काम आहे. परिषदेच्या कामाला समाजाकडून जितकी मदत व उत्तेजन मिळावयास पाहिजे तितकें तें मिळत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. तथापि त्या मदतीच्या व उत्तेजनाच्या अभावीं देखील परिषदेनें बरेंच उपयुक्त काम केलेलें आहे असें ह्मणावयास हरकत नाहीं. गतवर्षीं देशांत औद्योगिक बाबतींत जे उद्योग चालू होते त्यांचा संगतवार इतिहास रिपोर्टांत
ला आहे वायव्यप्रांताची औद्यो-
गि जॉन स्टुअर्ट यांच्या हुक-
अत्यंत महत्वाची
ट्र माहिन्यांत
भरवून

असून त्याना
ण्यावर त्यांची
ण्यांत

परस्पर सहाय्यक
इलाख्यांत जास्त
पासून बराच प
आहे. हातमाग, ब
नव्या नव्या युक्त्य
कला इत्यादि बाबींत
प्रगति दिसून येत
दिशेनें हातपाय हालविण
कर्तीच सुरवात केली
पहाणीचा कांहीं उपये
त्या सरकारास आतां थो
लेसें दिसत आहे, पण
ला अद्याप मुळींच सुरवात
तथापि औद्योगिक शिक्षणा
देण्यांत आल्या आहेत अ
येथें विणकामाची एक
झाली आहे. पण त्यापासून
ची निष्पत्ति झालेली
मध्यप्रांतात औद्योगिक प
ठरून एक सरकारी व बिन
दांची कमिटी नेमण्यांत अ
व लोहार यांच्यासाठीं
शिकविण्याकरितां एक शा
मंजुरी मिळाली आहे. आणि
तील विणकरांस धांवत्या धो
पुरविण्याविषयीं शिफारसी व
आहेत. मुंबई इलाख्यांत अं
णानें बराच मार्ग आक्रमिल
इच्या टेकनिकल इन्स्टिट
बराच खर्च करीत आहे.
प्रमाणेंच मुंबई सरकार देखी
पहाणी करण्याला
नाहीं. ब्रह्मदेशांत क
खान्यांस बरेंच य
आहे. देशी संस्थान
हीं संस्थानें नवे उ
जुनें उर्जितावस्थेस
प्रमाणेंच मदत

आपली औद्योगिक
साठीं या अवधींत लोकांनीं
पाहिलें पाहिजे. लोखंड
टाटा त्री

व्यवस्था
ढण्याची
लक्ष
कंपनीही
रा इंडियन
चालला
बँक, कल-
प्रांतां-
आपल्या

कल्पना
गाहे, साखर,
वस्तु आणि
चें लक्ष गेलेलें
चालू आहेत.
हिंदुस्थानां
आहे तिचें
केलें
हुका

आणी

ले बाबतींत
जास्त मह-
नेक तज्ञ

ची
पास
तील इतकें व्याज देण्यास शेतकरी आहेत. पण परस्पर सहाय्यकारित्वा-च्या आधारावर एकमेकाची पत वाढविणें ह्मणजे काय आणि हें काम कसें करावें याचा मार्ग दाखवून देणारी व वेळोवेळीं त्यांना सल्ला देणारी माणसें हवीं आहेत. या सहाय्यकारी पतपेढ्यांच्या तत्वाची व त्यांच्या कामाच्या प-द्धतीची मि. गुर्डे यांनीं आपल्या निबंधांत थोडक्यांत वाचकांना ओळख करून दिली आहे. हिंदुस्थानांतील खेडेगांवांतील शेतकरी लोकांना जास्त उपयुक्त अशी रेफीसेन नांवाची पतपेढ्यांची पद्धति त्यांना पसंत आहे. या पद्धतींतील मुख्य तत्वें येणें प्र-माणें आहेत. १ मंडळ्यांच्या फेडीची ज-बाबदारी मर्यादित नसावी २ कोणीही भा-गीदार नसावेत व अर्थात कोणालाही भा-गीदार ह्मणून नफ्याचा हिस्सा मिळूं नये. ३ मंडळीचें काम काज आटोपसर व ठ-राविक क्षेत्र मर्यादेच्या आंत चालावें, ४ मंडळीचें काम केल्याबद्दल सभासदांना वेतन देण्यांत येऊं नये. ५ कर्जाची फेड नफ्यां-तून किंवा शिलकेंतून करावी. या तत्वांवर युरोपमध्यें मंडळ्या स्थापन झाल्या असून त्यांच्या कामाला यश आलें आहे हिंदुस्थानां-तही याच तत्वांवर कांहीं ठिकाणीं पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत. आतां जर्मनींतल्या प्रमाणें या निरनिराळ्या स्वतंत्र मंडळ्यांची मिळून एक संस्था करणें हें काम व्हावयाचें आहे. या मंडळ्या अशा रीतीनें एकत्र झाल्या ह्मणजे एकमेकींच्या करितां तारण ह्मणून त्यांचा उपयोग करून घेतां येईल. आणि या प्रमाणें मंडळ्यांच्या पतींविषयीं समाजाची खात्री पटून कमी व्याजावर रकमा मिळ-ण्याला सोईचें साधन होईल. या कामांत सरकाराकडून पैसे मिळण्याची कांहीं जरूर नाहीं. लोकांचें कल्याण व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं अशा प्रकारच्या मंड-ळ्यांच्या तत्वांची ओळख लोक ... करून

स्थित ... दे
स्टँपाची जरूर लागू
आलें होतें. पुढें स. १८
कायदे बदलले तेव्हां पासून
दुर्लक्ष होऊं लागलें. पुढें पंचायती
वांना कोर्टापुढें आणून पक्का करून
ण्याला स्टँप लावणें भाग पडलें. अशा रीतीनें पंचायतीच्या मूळच्या स्वरुपाच्या कामाला उत्तेजन मिळण्याचें बाजूस राहून त्यांच्याकडून लोकांचीं मनें परतण्याची तजवीज झाली. तथापि सध्यांच्या स्वदेशी चळवळीच्या पुनरुज्जीवनाच्या काळीं या शुद्ध स्वदेशी संस्थांकडे लोकांचें लक्ष जाणें अत्यंत अगत्याचें आहे. अनेक वाग्शूर वी-रांनीं सरकारी कोर्टावर बहिष्कार घालून पंचायती स्थापण्याच्या प्रतिज्ञा केलेल्या आहेत. पण अद्याप कोणीही या कामाला पुढें सरसावत नाहीं ही मोठी खेदाची आणि लाजिरवाणी गोष्ट आहे. अशा प्रकारची एक संस्था पुण्यास सध्यां अस्तित्वांत आहे. ति-च्या रचनेची आणि कामकाजाची माहिती तशा प्रकारच्या संस्था काढूं इच्छिणाऱ्यांना उपयुक्त होईल असें वाटून रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं इंडियन रिव्हू मासिक पुस्तकांत प्रसिद्ध केली आहे. हें त्यांनीं मोठें महत्वाचें काम केलें आहे. रा. केळकर यांनीं दिलेली सर्व माहिती स्थलसंकोचामुळें येथें देतां येत नाहीं, तथापि अवश्य तेवढी येथें देत आहे.

पुणें लवाद कोर्टाची स्थापना स. १८७६ मध्यें झाली. पुणें शह-रांतील बहुतेक सर्व प्रमुख सभ्यगृहस्थ या संस्थेंत सामिल झाले. वकील मंडळी या पंचायतीच्या खटपटीच्या विरुद्ध असा-वयाची अशी एक साधारण समजूत आहे, पण समाधानाची गोष्ट ही कीं या लवाद मंडळींतील निमे सभासद वकीलांतले होते. स. १८९९ च्या ८ व्या कायद्यांतील ३२७ व्या कलमांत पंचाचे मर्फत वाद मिटवण्याच्या पद्धतीला मान्य करण्यांत आलें असल्यामुळें लवाद कोर्टाची स्थापना
... हुकूम कृती केली
... ली. या

पंच
३७८
किंवा देण्या
या रकमेचे दा
कोर्टांत चालले असते
खर्च लागला असतां.
कामें झालीं त्यांना फक्त रु.
खर्च आला. ह्मणजे साडेचार ल
बचत राहिली. हें एका कोर्टा
झालें. या मानानें सर्व हिंदुस्थाना
हिलें तर केवढी मोठी रकम व्यर्थ
वाचेल!

---

## राष्ट्रीय सभेविषयींचा व

सुरतेस राष्ट्रीय सभेच्या कामां
कोणी उत्पन्न केला हा वाद अ
आटोपत चालला आहे. दोन्ही
हकीगती प्रसिद्ध झाल्या असून
लोकमतही जाहिर झालें आहे.
व मेथा पक्षांत विशेषसें प्रेम
गोष्ट जगजाहिर होती. पण
एकंदर देशाच्या मानानें
महत्वाचे होते ही गोष्ट
ह्मणजे यंदांच्या सभेंतील गों
किती अविचारीपणा केल
नागपुराहून राष्ट्रीय सभा
डॉ. राश बिहारी घोस यांच्या
संबंधानें तक्रार व ठरावांच्या मसु
ओरड अशा तीन निरनिराळ्या
टिळक पक्षांकडून जसजशी वेळ
तसतशा पुढें आल्या. पण राष्ट्रीय
काम बंद पाडण्या इतक्या महत्व
तितकी पूर्णपणें रास्त यापैकीं ए
नव्हती असें बहुतेक सर्व हिंदुस्था
मत झालेंसें आहे. राष्ट्रीय सभेच्या
रा. टिळक व त्यांचे धोरेसे

येत
तर पंजाब
वे रा. टिळका-
एकमताचे आहेत.
रा. टिळकांचीं पत्रें
संपादित पत्रांचें मत त्यांना
आहे. बंगाल्यांत दोन दैनिक
रोज त्यांना निर्दोषी ठरविणारें पत्र
अशी स्थिति असल्यामुळें हा वाद
प्रतिकूल अशा रीतीनें मिटविला जात
तां प्रश्न इतकाच कीं रा. टिळक
: राष्ट्रीय सभेच्या गोटांत सामील
आपल्या मतांची अगदीं स्पष्टपणें
राची व राष्ट्रीय सभेच्या सभास-
तानें मान्य झालेलीं मतें त्यांनीं
य करावींत, निदान मान्य
सभेंत बखेडा तरी माजवूं नये.
होणार तें पहाणें आहे.

आतां शेवट होण्याची
ीच मोठी आहे. प्रांतिक
दिवस जवळ येत चालले
सभेप्रमाणें या परिषदांतही
करून नाचण्याला कांहीं
ाचे अनुयायी आहेत
ा माजवूं दावयाचा
मिळून पूर्वीच कांहीं करार
माणें वर्तन ठेवण्याला सर्वांना
याचें हा प्रश्न सध्यां प्रांतिक
विण्याची जबाबदारी ज्यांचेवर
ापुढें आहे. राष्ट्रीय सभेनें आपल्या
जें तीन कलमीं वचन मागें
लें होतें तें प्रांतिक परिषदेलाही लागूं
किंवा त्याच तत्वांवर दुसरी कांहीं
रवून तीं ज्यांना मान्य असतील
प्रांतिक परिषदेचे सभासद ह्मणून

…र खात्रीनें निराळें
…य नको ज्यांच्या कडून
…याचें त्यांच्या सामर्थ्याची
…यापूर्वी त्यावर खुशाल विश्वा-
…स्त असावें असें ह्मटल्यानें कदा-
… श्रोतृवृंदाकडून टाळ्या मिळतील पण व्यवहारकुशल पुरुषांकडून या कल्पनेला वेडाच्या लहरी पेक्षां जास्त महत्व दिलें जाणार नाहीं. बंगाल्यांतील कार्याकडे बोट दाखवून तें नुसत्या बंगाली लोकांच्या अंगीं लुप्त असलेल्या सामर्थ्याच्या विश्वासामुळें तें घडून आलें असें ह्मणणें ह्मणजे एक तर त्या कार्याचे पायीं अविश्रांत मेहेनत करणाऱ्या लोकांबद्दल तुच्छपणा दाखविणें आहे. केवळ लोकांच्या सामर्थ्याविषयींच्या विश्वासावर विसंबून कोणत्याही समाजाला कोणतीही गोष्ट करावयास उद्युक्त केल्यानें ती होणारी आहे तर मग बंगाली लोकांच्या मनाला न पटणाऱ्या अशा अनेक प्रकारच्या गोष्टी बंगाल्यांत अस्तित्वांत आहेत त्यांची भेट कां लागत नाहीं? लोकांच्या गुप्त सामर्थ्यावर बेभरवंसा केल्यानें कामाला दिरंगाई होईल हें खरें पण कधीं तरी काम होण्याची आशा साधनाच्या जोरावर करतां येण्यासारखी आहे पण फाजील भरंवसा ठेवून सर्वनाश झाल्या नंतर बोल कोणास लावावयाचा, लोकांच्या शक्तीला, कां शक्तीवर फाजील भरंवसा ठेवणाऱ्या पंडितांना ?

## हिंदी प्रजेची साम्राज्यांतील किंमत.

ट्रान्सव्हालांतील हिंदी लोकांच्या विरुद्ध सुरू झालेल्या यज्ञांतील पहिल्या आहुती पडून त्याला बरेंच गंभीर स्वरूप आलें आहे. ब्रिटिश साम्राज्यांत दाखल असलेल्या वसाहतींवर सार्वभौम सरकारचा किती अंमल चालूं शकतो आणि सार्वभौम सरकार आपल्या निरनिराळ्या देशांतील प्रजेची किती कदर बाळगतें याचा प्रत्यय या प्रकरणांत निश्चितपणें येणार आहे. ट्रान्सव्हालला स्वराज्याचे अधिकार देण्यापूर्वीपासून प्रजे… संबंधाचा प्रश्न…

पाडण्…
जो …
मंजुरी मिळाली. या कामांत हिंदी प्र…
ह्मणें ऐकावयाचें नाहीं किंवा त्यांचें ह्म…
ऐकून वसाहतवाल्यांना चार जोरदार शब्द सांगावयाचे नाहींत असा लार्ड एल्जिन यांचा पूर्वी पासूनचा विचार होता असें ह्मणावयास आतां मुळींच हरकत दिसत नाहीं. ट्रान्सव्हाल सरकारनें तर या कामीं आपला हेका पुरताच चालविण्याचा संकल्प केला आहे. उलटपक्षीं हिंदी प्रजा ही त्यांच्या ह्रास न जुमानतां आपल्या अब्रूला आणि मानाला हरताळ लावणाऱ्या कायद्याला भीक न घालण्याच्या निश्चयानें वागत आहे. या प्रकरणांत निकरावर गोष्ट येणार हें ट्रान्सवालांतील अधिकाऱ्यांस पूर्वीच कळून आलें… आणि ह्मणून त्यांनीं नोंदणी संबं… कायद्याचा अंमलबजावणी करण्याची मुदत दोन वेळां पुढें ढकलून हिंदी लोकां… मोचारानें वळले तर पहाण्याचा प्रयत्न के… पण ट्रान्सवालांतील हिंदी प्रजा आपल्या अब्रूला इतकी पारखी झाली नाहीं. तहकूबीचा कांहीं उपयोग झाला नाहीं हें पाहून तर वसाहतवाले जास्तच चिरडीस आले आहेत. हिंदी प्रजेनें या कायद्याला मानलेच पाहिजे, आणि यांत यत्किंचितही बदल करणार नाहीं असें ट्रान्सव्हाल सरकारचे प्रधान मि. स्मटस यांनीं दोनदां बजाऊन सांगितलें आहे. कायद्याला न जुमानतां स्वतःला नोंदवून न घेणाऱ्या हिंदी लोकांवर खटले होत असून त्यांना कैदेच्या शिक्षा होत आहेत. पहिली आहुती या चळवळीचे पुढारी मि. गांधी यांची पडली आहे. व त्यांचे कित्येक सहाय्यकर्ते त्यांच्या बरोबरच तुरुंगवास भोगीत आहेत. आपण या बाबतीत कांहीं करूं इच्छित नाहीं. असें सर बॅनरमन यांनीं एका अर्जास उत्तर दिलें आहे. या प्रकरणाचा शेवट कशा रीतीनें होतो इकडे सर्वांचे डोळे लागून राहिले…

प्रमुख म…
ब्रह्मविद्येची…
अदृष्ट लो…
मरणाचें रा…
मूर्तीचे कल्प…
व्याख्यानें झ…
स्टरची धर्म…
नाचा अ…
गाडीनें…

मग …
यांच्या लाटा…
व्यक्त करण्याची…
एडगर य.चें अ…
व त्यांच्या अनु…
यंदाप्रमाणें लाभ…
पासून इच्छितों.

ध…

हवामान—गे…
दूषित झाली होती…
इत्यादि रोग बळें…
नाची गोष्ट कीं अ…
आहे.

रा० रा०…
स्वारी आत्…
मार्गानें…

इ० नी०व पा... ... ३
य, खोकला, शूल, इ० नी० .... १५

## व व्यवस्था.

धें घेणारांस दर रुपयास दोन आणे;
स्तीस रुपयापर्यंत चार आणेप्रमाणें
जास्त औषधें एकदम घेणारांस याहून

नसंजीविनी पाक या औषधांस वेगळें
कमिशन त्यांच्या दरांत दिलेंच आहे
दर रुपयांस दोन आणे, पंचवीस रुप
तीस रुपयापर्यंत चार आणें वेगळें

आहे तो फुकट पाठवूं. औषधांत अपाय
ची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें
नेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में,
त्तरें वगैरे माफक दरानें मिळतात,
पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें
चें निदान व चिकित्सा करूं.
आमचे कारखान्याची प्रचंड वाढ
असें भासविण्याकरितां आमच्याच
आमचें नांवासारखी अशा कित्येक
आमच्या सर्व ग्राहकांस अगत्य पूर्वक
कारखान्याच्या नकला होत. सबब
लकुलसंबंध नाहीं हें अवश्य लक्षांत
न चूक सही व पत्त्यावर मागवा.

## वर्तमानें.

मोठी आग लागलेली दृष्टीस पडली. या
चें भयंकर नुकसान झालें. अदमासें ४
तून बाहेर पडलेल्या लोकांचा देखावा
पाणी मिळणें मुष्किलीचें झालें. आगीचें
चा तपास चालू आहे!

खगी रीतीनें कैदखान्यात अगर स्टीं-
या ज्या वेळेस ही शिक्षा अंमलांत येईल
तील, असें मध्यप्रांताच्या सरकारी गॅझेटांत

# नागिरी

आमचा देशी औषधे नेहमीं उ
मोठें शक्तिमान केलें पाहिजे. हच
मुख्य कर्तव्य होय. आमचीं औष
असून त्यांनीं रोगाचें शमन फार
आजकाल देशी औषधाचे जे कांहीं
फार गुणकारी अशी सर्वतोपरी
नेहमीं आमचींच औषधें घेऊन रो
शमन करण्यास समर्थ व्हावें अशी

# अति उंची सु
# आयुर्वेदौषध

## किंमत पोस्टेजसह अ

ह्या पेट्यांत भरपूर सुगंधी मा
नवीन भर घालून

या पेट्या उत्तम सागाचे लांक
अति सुरेख व मजबूत बनविल्या
राळ्या अत्तरांच्या बाटल्या तीन
बेलिया १॥ तोळा बाटली एक,
सौभाग्यदायक सुगंधी लालभडक
असून,त्यांनीं कुटुंबांतील सर्वांचा
आयुर्वेदिक पद्धतीप्रमाणें तयार के
पडणारीं अशीं सुवर्णमालिनीव
रामबाण गोळ्या, पटकीवरील ग
कफनाशक गोळ्या व आनंदवर्धक
आहेत. मिळन यंदाचे पेटींत
अत्यंत माफक ह्मणजे पोष्टखर्चासह
पेट्या एकदम ६ घेणारांस
यांत गुलाब, हिना, केवडा, अंबर
धी अत्तरें १॥ रुपये तोळ्याप्र
मस्ता, चमेली, मोगरा इ० सुग
मिळेल हा माल कोणास धाऊक
देऊं. एकदम ४ तोळे अत्तर घेणा
प्रकारचा सुगंधी माल आमचेक
हार करावा.

### ज्ञा. जाहिरात

खालीं सही करणार इजकडुन सर्वत्र शेटसावकार लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचें घर ताजनापेठ येथें आहे. त्या घरांत हल्लीं राहणारा इसम नामे बी सीसया वा॥ एकंया तेलंगी हा रहात आहे. आमच्या घराची चतूःशिमा. पूर्वेस दर्गा. प. उमरखां याचे घर द. सडक असून गूलमहमद याचें घर उ. इस्माल वा॥ घासी भीस्ती याचें घर हें कोणी विकत अगर गहाण किंवा बक्षीस घेऊं नये. घेतल्यास तें बातल असें. कळावें. ता.८-२-०८

सह्या

(१) ऊशमाबाई मर्द एकंया तेलंगी

(२) पोचमाबाई नि. बा.

नं. क. २१

### ज्ञा नोटीस

नोटीस बेशमी विठु वल्लद सदाशीव पाटील मौजे सावणी ता० बाळापूर जि० आकोला यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते आहे कीं तुझी माझी मुलगी नामे पार्वता उर्फ सोनी इजला आपण आजमास पांच वर्षांपासून माझें घरीं आणून घातले आहे त्यानंतर मी आपणास बरेच वेळां मुलगी घेऊन जाण्याबद्दल निरोप व पत्रें पाठविलीं परंतु निरोपाचें व पत्राचें उत्तर न देतां घेऊनही गेले नाहीं त्या योगानें मजला तिचा माझे घरीं राहिलेले दिवसाचा चार रुपये दरमहाप्रमाणें दोनशे वीस रुपये खाण्याचा खर्च आला. याशिवाय दरसाल पांच रुपयाचे लुगडी दोन असें पाच वर्षांचें पंचवीस २५ रुपये वस्त्र प्रावर्णाबद्दलचा असे एकून दोनशे पंचेचाळीस २४५ रुपये मजला खर्च आला. तुझी माझे मुलीस माझे घरीं ठेऊन गेलेबद्दल खर्च आला आहे सदर्हू रुपये मी कर्जाऊ सावकारापासून आणून मुलीचें पोषण करीत आहे कारण वरून इतके पैसे खर्च करीन इतका सुखी नाहीं. मी आतां आपण ही नोटीस पावतांच [illegible] दिवसांचे आंत सदर्हू रक्कम व्याजासुद्धां देऊन मुलीस घेऊन जावे आमची हरकत बिलकूल नाहीं जर असें न कराल तर तुमचे उत्तराची वाट न पाहतां आठ दिवसा नंतर माझे मुलीवर नवरे पणाचा हक्क मुळींच राहणार नाहीं व वरप्रमाणें आपण न कराल तर आह्मी ही नोटीस फारकतीच आहे असें समजूं व या नोटिशीचे आधारानें रीतीप्रमाणें दुसरा गंधर्वाचा नवरा केला जाईल तरी तुमची यासंबंधी जी कांहीं हरकत असेल ती वाडेगांव येथें येऊन पंचा समक्ष कळवून आपला निकाल करून घ्यावा कारण आपण संसारांत योग्य आहांत किंवा नाहीं ही आपली बापलेकाची पूर्ण खात्री होऊन पंचासमक्ष निकाल व्हावा अशी आमची इच्छा आहे व आपले घरांत अशा संबंधी यापूर्वी दोन मुलांच्या फारकत्या झालेल्या आहेत करितां आपणांस सुचना केलेली आहे या नोटिशीचें उत्तर न आल्यास मी पुढें वर लिहिलेले कामांत कोणतेही प्रकारें हरकत आपले कडून नाहीं असें समजलें जाईल. दुसरें आपण नोटिशीनें कळवितां कीं माझे मुलीस माझे घरीं तुह्मी आणून घातली त्या वेळेस त्या मुलीच्या अंगावर दागीने होते परंतु मुलगी गाडींतून उतरल्या बरोबर शेजारी व गावकरी लोकांनीं पाहिली होती. तेव्हां तिच्या अंगावर दागिने नव्हते. व झोळण्यांत रुपयेही नव्हते. याचा पुरावा गवांकरी लोक करतीलच. सदर्हू मुलगी घरांत कारभारीण नव्हती कारभारीण असती तर तुमचे ह्मणणें कदाचित कबुल केलें असतें कारण तुमचे घरांत आई बाप कारभारी आहेत आमचे घरीं आली ते वेळीं अंगावरील लुगड्या शिवाय दुसरा डागिना किंवा रुपया आह्मी व दुसरे कोणीच पाहिला नाहीं दुसरा असा मारुजा आहे कीं तुह्मी आपले बापास सांगा कीं आपला रुपया खरा आहे किंवा खोटा आहे असें बद्दल वाडेगांव मुक्कामीं पंचा समक्ष खात्री करून घेऊन आपली सुन घेऊन जावी असी समज घ्यावी नाहींपेक्षां लिहिलेले नोटिशीवरून खास फारकती झाली आहे असें समजलें जाईल यांत संशय नाहीं सदर्हू मुलीचा संसार आपले कडून होत नसल्यास हीच फारकती आपले कडून सही होऊन आली ह्मणजे समजली जाईल परंतु तिच्याबरोबर संसार करणें असल्यास वरील रकम व्याजासहित पंचात देऊन आपली बायको घेऊन जावे नाहींपेक्षां नोटीस वापस सहीनिशीं करून द्यावी ह्मणजे आह्मी फारकतीच आहे असें समजूं व दुसरे घरीं मुलीस देण्याची व्यवस्था करूं यांत संशय नाहीं व सदर्हू नोटीसीची नकल जनाब तहशिलदार साहेब बहादूर बाळापूर यांचेही कडेस देण्याचा विचार आहे अगरची वाडेगांव मुक्कामीं आपण समक्ष येऊन मजला पंचास वरील खरा प्रकार दाखवाल तर मग सदर्हू नोटीस तिकडेस दिली जाणार नाहीं ही नोटीस लिहून दिली ता० १०-२-१९०८ इसवीं

सही

अंबरसींग वल्लद इरभानजी पाटील आडनांव सरप रा. मौजे वाडेगांव निशाणी खुद्द हातची असें

नं. क. २२

### ज्ञा नोटीस

नोटीस बेशमी बापुन्या वल्लद टलु कुणबी पारसकार राहणार पारखेड ता. आकोला यांस:—

खालीं सही करणार ईजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा गंधर्वाचा नवरा आहेस ज्यावेळेस गंधर्व झालें त्यावेळीं पंचा समक्ष लेखी करारनामा लिहून दिला असून तुह्मी कान्हेरी येथें राहण्याचें कबुल केलें तरी तुह्मी गंधर्व झाल्यापासून फक्त एक महिना राहिला पुढें तुह्मी पारखेड येथें राहण्यास गेले तेव्हां पासून तुमची वाट पहात आहे तरी तुह्मी येणार असें कांहीं वाटत नाहीं तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत कान्हेरी येथें येऊन मला नांदवावे न याल तर हीच फारकती समजून दुसरा नवरा करीन पुढें तुमचे माझ्यावर कोणतेच प्रकारची सत्ता राहिली नाहीं या नोटिशीनें कळविलें आहे व नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें ता. ११-२-०८

सही

अजी मर्द बापुना कुणबी पारसकारीण राहणार कान्हेरी ता० आकोला निशाणी खुद्द हातची बांगडी असे

नं. क. २३

### कडबा तोडण्याचें यंत्र



सावकार—राम्या हीच कां कामाची रीत!

राम्या—काय झाल ?

सावकार—झाले काय! जनावराची उपास मार झाली. सगळ्यांच्या पुढें कडबा तोडून बारीक करून कां घातला नाहींस?

राम्या—सावकार, कुन्हाडीनें किंवा कोयत्यानें कडबा तोडून आमच्याच्यानें २०-२५ गुरांना घालवते होय यंत्र आणा, मग घालतो.

सावकार—त्यलारे कसलें यंत्रें ! कडबा तोडावयाचीं यंत्रें रे कुठे मिळतात ?

राम्या—नाहीं का परव। आमच्या त्या रामजी पाटलांनीं १० रुपये देऊन बेळगांवाहून किर्लोसकर बंधूकडून एक कडबा तोडण्याचें यंत्र आणिलय त्यानें कसा अगदीं कडबा कराकर तोडून निघतोया.

सावकार—बरें तर मीही किर्लोस्कर बंधु बेळगांव याच्याकडून एक तसलेंच यंत्र मागावितों.

नं. ४५

### जाहिर नोटीस.

सर्वच अमामीस कळवितें कीं रा. रा गणूसा रामासा रंगारी यांचा बाकी रकम ज्याचे कडे घेणें आहे ती त्यांनीं मला देऊन पावती घ्यावी अगर दर्शनी हुंडी द्यावी अगर मनीआर्डर करावी सावजी गणूसा रामासा हे ता. ३-६-०७ ला वारले ते दिवस पासून व्याज दिवाळीचे आंत रुपये देणारास माफ व निमे व्याज नागदिवाळीचे आंत देणारास माफ. जर कोणी संक्रांतीचे आंत रुपये देणार नाहींत. त्यांजपासून दस्तैवज दरमहा शेंकडा तीन रुपये प्रमाणें व्याज घेऊं व माझ्या जिनगी पैकीं एक चतुर्थांश स्थावर व जंगम जिंगी तुकारामसा भवानसा रंगारी बाळापूरकर याजला माझे तर्फेचें काम चालविण्याबद्दल दिली आहे. ह्मणजे मी इस्टेटची मालकीण असून बाकी इस्टेटचा मालक तुकारामसा भवानसा रंगारी हे आहेत. व हे रुपये विश्वनाथसा नागोसा याजला व भाइ बिरादरांस देऊं नका जर द्याल तर मजरा देणार नाहीं. ता. ४-१०-१९०७ इसवी

सही

धुरपता बाई जवजे गणूसा रंगारी साहू दुकान खामगाव निशाणी हातची सहीची अक्षरे.

नं. ४६

### पैसे कमाविण्याची युक्ती

### वाचा व आपलें हित करा

गजकर्णाचें सोनेरी मलम दर सी. ४ आणे २४ तासांत गजकर्ण इसब बरेकरणारें औषध


बक्षीस

१२ कुप्या घेणारास १ बर्मा टाईमस बक्षीस

१८ कुप्या घेणारास बर्मा आलाराम बक्षीसें

२४ घेणाऱ्यास रासकोप सिस्टम ३। रु. वाले खिशांतलि घड्याळ बक्षीस.

४८ घेणाऱ्यास संगीत गाणारें ६ इंच उंचीचें टिकाउ व मजबूत घड्याळ बक्षीस



रासकोप सिस्टिम घड्याळ इतके कांहीं मजबूत आहे कीं थोड्या किंमतींत मिळून ५-७ वर्षें खुषीनें चालतें कोणाही कंपनींनीं इतकी स्वस्त घड्याळें विकण्याची हिंमत केली नाहीं या घड्याळाची किंमत ३। रु. पो. खर्च ।-आणे बक्षीस मिळणारें सामान कांच, कमान पेटी व साखळी इतके प्रत्येक घड्याळा बरोबर इनाम

बक्षीस

वरील सहा घड्याळें एकदम घेणाऱ्यास एक घड्याळ बक्षीस मिळेल ह्मणजे ७ किं पो. खर्चासुद्धां रु. २१. सामाना सहीत वरील बारा घड्याळें एकदम घेणारास ३ घड्याळें बक्षीस मिळतील पो. खर्चासुद्धां रु. ४१ सामाना सहीत

पत्ता:-के. नुरा कं० भेंडीबाजार मुंबई

नं. ४७

त्वरा करा ! त्वरा करा?

### बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतीनें शिकविले जाईल दर माफक असून वक्तशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. व बाहेर गांवच्या लोकांकडून रेलवेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

अहमद अली कासमजी बोहरा

आकोला (शहर)

नं ४८

## नोटीस

दि० मु० नं० ७४९ सन १९०७
विद्यमान सब जज्ज साहेब कोर्ट दर्यापूर.

वादी

गंगाराम यादोजी रा० नाचोण व जानराव यादोजी व खुशाल वल्लद यादोजी प्र० नं २-३ रहाणार काकडा.

प्रतीवादी

नारायण कासोबा पतींगें रा० लेहगांव ता० दर्यापूर व बायजी मर्द शामराव रहाणार चेंडकापूर ता० अकोट.

दावा रुपये

प्रतिवादी — नारायण कासोबा पतींगे रहाणार लेहेगांव व बायजाई मर्द शामराव रा० चेंडकापूर ता० अकोट यांस कळावें कीं, वरील मुकदम्यांतिल प्रातिवादी समन्स तुम चेवर बजावूं जाऊं नये ह्मणून वारंवार टाळाटाळी करीत आहे असें बद्दल वादीनें आमची खात्री आफिडेव्हिट वरून केली त्यावरून कलम ८२ प्रमाणें तुह्मांस कळविण्यांत येतें कीं तुह्मी आमचे कोर्टांत जबाब देण्यासाठीं दर्यापूर येथें ता० २६ माहे फेब्रुवारी सन १९०८ इ. रोजीं दिवसा १० वाजतां हाजर रहावें हाजर न राहाल तर एक तर्फी चौकशी केली जाईल कळावें. ता. ८-२-१९०८ इ.

Prem Narayan.
सब जज्ज कोर्ट दर्यापूर.

नं. क. १२

## नोटीस

दिवाणी मुकदमा नंबर २८३ सन १९०७
विद्यमान मुनसफ साहेब नंबर २ कोर्ट आकोलें.

श्रीपुज्यजी श्रीनरपति चंद्रजी गुरु रतन चंद्रजी सुरीश्वरजी राहणार निंबा हेरा मेवाडस्टेट — वादी

१ कन्हयालाल हेमचंद २ फुलचंद पानाचंद, ३ मनुलाल छबीलदास ४ जीवनलाल फतेचंद व त्रीभुवनदास सीवलाल गुजराथी सर्वांची वस्ती पेठ बाळापुर ता० मजकूर जिल्हे आकोला सी. प्रो. क. ३० — प्रतिवादी

प्रमाणें जाहिर नोटीस

बाळापुर पेठ तालुके मजकूर जिल्हा आकोला येथील लोकागच्छ केशवजी पंथाचे सर्व गुजराथी लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं श्रीपुज्यजी श्रीनरपति चंद्रजी गुरु रतनचंदजी माहाराज यांनीं जुने वसईचे उत्तरें काडील घर गुलाबबाई मर्द रतनचंद ईचे मलकीचें असून तें विकत घेतल्यावरून आपल्याकडे त्याची मालकी आली आहे व त्याचा लोकागच्छ केशवजी पंथाचे पुढारी कन्हयालाल हेमचंद व फूलचंद पानचंद व मनुलाल छबीलदास व जिवनलाल फतेचंद व त्रिभूवनदास सीवलाल यांनीं त्यांचे तर्फे अन्यायानें कबजा घेतला आहे वरून त्या घरावर आपली मालकी ठरवून ताबा घेण्या करितां आमचे कोर्टांत दिवाणी मुकदमा नं. २८३ सन १९०७ चा दावा आणिला आहे. त्यांत सर्व लोकागच्छ केशवजी पक्षाचे लोक तर्फे वरील पुढाऱ्यांवर दावा चालविण्याबद्दल वादीनीं सी० प्रो० कलम ३० प्रमाणें परवानगी मागितल्यावरून त्यास तसें करण्याबद्दल हुकूम देण्यांत आला आहे. व सदरहू दाव्याची पुढील चौकशीची तारीख १६।३।०८ ईसवी रोजीं आकोले मुक्कामीं आमचे कोर्टांत नेमिली आहे तरी लोकागच्छ केशवजी पंथांतील ज्या कोणास सदरहू दाव्यांत प्रतिवादींत कोर्टांत आपलें नांव शरिक करून तकरार करणें असेल त्यानें वरील तारखेस अगर त्यापूर्वी आमचे समोर स्वतः अगर वकील अगर कायदेशीर मुखत्यार मार्फत दिवसाचे १० वाजतां हाजर राहावें ही नोटीस आज ता० ५।२।०८ इसवीं रोजी आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिली असे.

K. B. Palsole
मुनसफ नंबर २
नं० क १३ आकोला.

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस विशेषें वसाडी खु० व बु० व आसपासचीं गांवें ता० मलकापूर जि० बुलडाणा येथिल लोकांस खालीं सही करणार यांजकडून प्रार्थना केली जाते कीं माझा चुलत भाऊ नामे भीकनराव संपतराव दे० राहणार वसाडी खुर्द याचे आई बाप वारल्या पासून हा वाईट लोकांच्या संगतीस लागून दुर्वर्तनी होऊन बेफाम बनला आहे व अज्ञान आहे. त्याच्या पालनकर्त्याचा हक्क मजशिवाय कोणाकडेसच नाहीं. तरी याच्या कोणत्याही प्रकारच्या इस्टेटीची घेवदेव माझ्या परवानगी शिवाय कोणी करील तर ती बेकायदेशीर होऊन बातल ठरेल त्याच प्रमाणें नांदुरा सबरजिस्ट्रार साहेबांनींही कृपाकरून मला विचारल्याशिवाय सदरहू मुलाचा कोणताही दस्तऐवज न छापण्याची मेहेरबानगी करावी कळावें ता० ७-२-१९०८ इ०

सही
माधवराव सिताराम देशमूख
नं. क. १४ दस्तूर खुद

## नोटीस

बेशमी सफदरखा वल्लद मुसेखा राहणार पिंपळगांवराजा ता० मलकापूर जि० बुलडाणा यांसः—

या जाहिर लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आमचे आप्त असून घरांतल्या घरांत भांडण उत्पन्न करण्याच्या इरादानें पोकळ खरेदीखतें लिहून नोंदून घेतलीं आहेत. हरुणखा हा माझा भाऊ निशाबाज असून कधींच शुद्धींत नसतो. त्याची बुद्धि इतकी नष्ट झाली आहे कीं त्याचें त्यालाच कशाचेंच भान नसतें. अशा त्याच्या मनच्या स्थितींत तुह्मी खोटाच ४ हजार रुपयांच्या भरणा खरिदीच्या खतांत दर्शविला आहे. हरुणखा हा पुष्कळ वर्षांपासून त्याच्या दुर्गुणामुळेंच वेगळा केलेला आहे. त्याच्या मालकीची स्थावर जंगम जिनगी कांहींच नाहीं. ही गोष्ट तुह्माला माहित असूनही तुह्मी मुद्दाम आमच्या मालकीच्या जिनगींतील कांहीं भाग हरुणखाकडून खरिदी घेतला आहे. तुह्मी त्या खरिदीच्या आधारें जिनगीवर ताबा करण्याच्या इरादानें पोकळपट्टे कुळाकडून करून घेत असतां असें लोक बोलतात त्या रितीनें जिनगी मिळत नसते हें पक्कें समजावें. तुह्मी हरुणखाला फुसलावून घरादारांतील जंगम माल लांबवीत असतां असेंही माझ्या कानीं आलें आहे. ही नोटीस तुह्मास सूचना ह्मणून दिली आहे. या उपर तुह्माला सरकारी कोर्ट खुले आहे. तुमच्या असल्या घर डुबविण्याच्या कृतीमुळें माझी झालेली नुकसानी तुह्माकडून भरून घेतली जाईल. कळावें ता० ७-२-१९०८ इ०

नं. क. १५ सही
अहमदखा वल्लद दरूफखा

## नोटीस

नोटीस बेशमी हरुणखा वल्लद दुरूफखा राहणार पिंपळगांवराजा तालुका मलकापूर यांस —

या लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्मी सफदरखा यांच्या सल्लयानें विनाकारण अधिकार व मालकी नसतांहि आमच्या जिनगीसंबंधानें पोकळ विक्रीखातें करून देतां ही गोष्ट फार वाईट होय. असें पुनः करूं नये आणि हल्ली आह्माला जी तोषीस तुमच्या कृतीमुळें लागली आहे ती तुह्मांकडून वसूल केली जाईल. कळावें ता. ७-२-०८ इ.

नं. क.१६ सही
अहमदखा वल्लद दुरूफखा

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा धाकटा भाऊ हरुणखा वल्लद दुरूफखा हा नेहमीं निशेच्या धुंदींत असतो. त्याच्याजवळ जिनगी कांहीं नाहीं. तो पुष्कळ वर्षांपासून वेगळा आहे. तर कोणीही त्याच्याबरोबर याच्या स्थावर जंगम जिनगी संबंधानें कोणताच व्यवहार करूं नये. इतक्या उपर जर कोणी व्यवहार करील तर त्याची जोखीम त्याच्या जातीवरच राहील. कळावें ता० ७-२-१९०८ इ०

नं. क. १७ सही
अहमदखा वल्लद दुरूफखा

## नोटीस

नोटीस बेशमी आनंदा वा गणेश चौंदरी कुणबी वा न्हावी ता यावल जी० खानदेश यांस —

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे मालकीचें शेत मौजे न्हावी येथील स० नं० ४८२ एकर ४८१७ आकार रुपये १० शेत सालीम आज सुमारें तीन चार वर्षें वहीत करीत असून त्याचें नक्याचेंबद्दल आह्मास अद्यापपर्यंत कांहीं दिलें नाहीं तुह्मास स्वामित्वाबद्दल फारवेळ मागणी केली असतां नुसते देतो ह्मणून सांगतां परंतु देत नाहीं व शेत ही आमचे ताब्यांत देत नाहीं तर या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी वहीत केलेल्या सालांबद्दलचे स्वामीत्वाचे पैसे मजला ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत देऊन माझी पावती घ्यावी नंतर पुढें वहीत करावें तसें न केल्यास मागील सालचे वहींत केलेल्या स्वामीत्वाचे पैशाबद्दल व ताब्याबद्दल तुमचेवर योग्य कोर्टांत दावा करून खर्चामुद्दां पैसे घेण्यांत येतील ही नोटीस दिली सही कळावें ता० ११।१।०८

सही
नारायण शिवराम आ. पा. क०
बचूलाल गोंदुलाल साहू
नं. क. १८ दुकान आकोला

## जाहिर नोटीस

नोटीस बेशमी सिवलाल हरबकस मारवाडी व जयराम सुकदेव मारवाडी तर्फे वहिवाटदार पांडुसा रामकीसनसा रंगारी सर्व राहणार कारंजा ता० मूर्तिजापूर जि० आकोला, यांसः—

खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं रोज गुरुवार तारीख ६।२।१९०८ इसवीं रोजीं तुह्मी मजवर तगादा पाठविला तर तुमचें कर्ज मजकडे कोणत्याच प्रकारचें नसून तुह्मी विनाकारण मजवर तुफान रचित आहां मी आज पावेतों तुह्मांस कोणतेंच प्रकारचा दस्तऐवज किंवा टिकिट वहीवर सही करून दिलो नाहीं व तुमचे जवळून कर्जही घेतलें नाहीं असें असतां तुह्मी एखादां बनावट दस्तऐवज माझे सहीचा केला असल्यास मी तुमचेवर फौजदारी फिर्याद दाखल करीन या पुढें तुह्मी मजवर तगादा वगैरे कांहीं पाठवूं नये पाठविल्यास त्याज बद्दल तुमचा योग्य बंदोबस्त केला जाईल कळावें ता० १०।२।१९०८ इ.

सही
सहीची नीशाणी गणु वल्लद
नरासिंगजी देशमुख रोकडे
राहणार दादगांव ता०
नं. क. १९ मुर्तिजापूर द. खु.

## नोटीस

आकोट म्युनिसिपाल ऑफीस ता. १।२।०८ इ.

जनरल कमेटीचा ठराव नंबर ६ तारीख १६।१।०८ इसवीं

वरून आकोट म्युनिसिपाल कमेटीच्या हद्दींत राहणारे सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं आकोट म्युनीसपाल कमिटीनें म्युनीसिपाल कायद्याचें कलम ९२ अन्वये खालीं नमूद केलेल्या जागाशिवाय इतर कोणत्याही ठिकाणीं कोणासही व्यापाराकरितां जळाऊ लाकडांचा संचय न करूं देण्याविषयीं अगर सदरहु लाकडांच्या गंज्या न लावूं देण्याविषयीं ठरविलें आहे. तरी ज्या कोणास वरील लाकडाचा व्यापार करणें असेल त्यांनीं आपआपली नांवें कलम ११४ प्रमाणें रजिस्टर करून घेऊन २५ रुपये फी देऊन लायसन्स घ्यावें. तसें न झाल्यास कलम ११४ (१) प्रमाणें ते दंडास पात्र होतील.

वरीलबाबतची अमलबजावणी नोटिशीचे तारखेपासून एक महिन्यानें सुरू होईल.

जळाऊ लाकडांचा व्यापार करण्या करितां नमूद केलेल्या जागा

गट नंबर १ मि हमुबाबासाहेब यांचे मळ्याचे कुंपणा जवळील जागा

गट नंबर २ आठवडे बाजाराचे दक्षिणेकडून सडकेला लागून असलेली जागा

सही
रामचंद्र विनायक धर्माधीकारी
फॉर चेअरमन म्युनीसिपाल
नं. क २० कमेटी आकोट.

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

BERAR SAMACHAR

वर्ष ४२ ] आकोला वऱ्हाडसमाचार तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १९०८ इ० [ अंक ८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवी ट. हा. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः--- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्यांच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक

ह्या बँकेत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील. आणि तो पैसा या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागे राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमाच्या प्रती बँकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०५ } G. A Phillips एजंट

नं ७३

नहि सत्यात् परोधर्म

## येवल्याचे पितांबर व पैठण्या

आह्मी येवले येथें तयार होणारे पितांबर, पैठण्या व खण वगैरे माल बाहेरगांवी पाठवित असतो. माल खात्रीबंद माफक दरानें व योग्य अडतीनें पाठऊं. गाठ रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जाईल. माल स्वस्त, सुबक व बक्तशीर पाठविल्याबद्दल आह्माप शेंकडों पत्रें आलीं आहेत.

पत्ताः---
श्रीनिवास बाळकृष्ण होले जनरल मर्चंट व कमिशन एजंट

नं. ७२ ५/२

## जोगळेकर आणि मंडळी लिमिटेड.

सरकारच्या सन १८८२ च्या सहाव्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केली आहे.

स्थापना सन १९०७
भांडवल एक लक्ष रुपये.
प्रत्येक भाग २५ रुपयाचा
याप्रमाणें एकंदर भाग ४०००.

भागीदारानें भाग मिळण्या करितां अर्ज करते वेळीं दरएक भागाबद्दल अर्जासोबत रुपये १० व अर्ज मंजूर झाल्यावर रु. ५ व बाकीची रकम प्रत्येक महिन्यांत रु. ५ प्रमाणें पुरी करुन दिली पाहिजे.

सदर्हू कंपनीचें मेमोरँडम् व आर्टिकल्स ऑफ आसोशिएशन आकोला येथें सदर कंपनीचें आफिसांत पाहण्यास मिळेल. प्रास्पेक्टसच्या प्रती सदर्हू आफिसांत अर्ज केला असतां मिळतील.

बोर्डाच्या हुकूमावरुन
पी. सी. जोगळेकर आणि कंपनी
म्या. एजंटस्

नं. १३

### पाहिजे

आह्मांस एक गुमास्ता पाहिजे. त्यास जमाखर्चाची माहिती उत्तम असावी. शिवाय कोर्टाचेंहि काम करावें लागेल. हुशारी पाहून पगार दिला जाईल. गरजूंनीं खालील पत्यावर समक्ष भेटावें.

सही
गोविंदा शिवाजी पाटील साहू
नं० ६९ ५/३ दुकान बटवाडी ता. बाळापू


### नं. ७२ नोटीस

सालाबादा प्रमाणें आठवडे बाजार, स्लाटर हाउसेस्, शहरांतील, पेठेंतील आणि पडावांतील कचरा, यांचे हक्काचा हरास सन १९०८-९ सालाकरितां, तारीख १३-१९०८ इसवीं रोजीं टाउन हालमध्यें होणार आहे. ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हु तारखेस टाउनहॉल मध्यें सकाळीं ८ वाजतां हजर राहावें कळावें. ता. २०-२-१९०८

P. D Sontake
सेक्रेटरी
म्यु० कमीटी आकोला.

नं. ५/५

### नं. ७३ नोटीस

कि० दिवाणी दावा नंबर ४ सन १९०८ अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नं. ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वये नोटीस.

विद्यमान डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्य साहेब

जि. आकोलें यांचे कोर्टांत
अज्ञान---रामचंद्र सिताराम

अर्ज अज्ञानाचें पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल

अर्जदार मुंजाई मर्द भोनाजी वरती वेळखेड तालुके. आकोट यानें असा अर्ज दिला आहे कीं मला अज्ञानाचें पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचें संरक्षण करण्या करितां दाखला मिळावा ह्मणून अर्ज केल्यावरुन त्या अर्जाची चौकशीची तारीख १६ माहे ३ सन १९०८ इसवीं रोजीं आकोलें ठिकाणीं नेमली आहे तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येतें कीं अर्जदाराशिवाय जे इतर नातलग, मित्र, आप्त, अथवा ज्यांना अज्ञानाचें बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं सदरील अज्ञानाचें पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरील तारखेस येऊन हजर व्हावे आणि आपल्यास कां नमावें असेंबद्दल जे कांहीं दखले अगर दस्ताऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्याकरितां हजर करावा.

आज तारीख १९ माहे २ सन १९०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी ही नोटीस दिली आहे.

A. D C. Bar
District and sessions judge
AKOLA

नं. ५/५

## वर्तमानसार

सुरतेस काँग्रेसला ब्रिटिश कमिटीचे प्रतिनिधी या नात्यानें आलेले डॉ. रदरफर्ड हे इंग्लंडांत परत गेल्यावर त्यांच्या सन्मानार्थ एक मेजवानी देण्यांत आली होती. सदर प्रसंगीं डॉक्टर रदरफर्ड ह्मणाले:- पार्लमेंटच्या संमतिशिवाय झाकाखेल लोकांशीं लढाई करणें गैर आहे. हिंदुस्थानास उच्च प्रतीच्या स्वराज्याचे हक्क देण्यांत आले पाहिजेत. त्या हक्कांचा उपभोग घेण्याची पात्रता तेथील हजारो मनुष्यांच्या अंगीं आहे. इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानासही सरकारानें उदार तत्वेंच लागूं केलीं पाहिजेत.

'नवशक्ति' पत्राच्या २८ डिसेंबरच्या अंकांत राजद्रोही लेख छापून प्रसिद्ध केल्याबद्दल त्या पत्राचे मुद्रक व प्रकाशक बाबू मनमोहन घोष ह्यांच्यावर खटला झाला होता. त्याचा निकाल चीफ प्रे. मॅजिस्ट्रेट मि. किंग्सफर्ड ह्यांनीं बुधवारीं दिला. आरोपी दोषी आहे असें ठरवून मि. किंग्सफर्ड ह्यांनीं त्यास सात महिन्यांची सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड व दंड न दिल्यास आणखी चार महिन्यांची सक्त कैद अशी शिक्षा दिली.

'सध्यां' पत्राचे मुद्रक मि. चातर्जी ह्यांच्यावरही राजद्रोही लेख छापल्याबद्दल खटला झाला होता त्या खटल्याचाही निकाल मि. किंग्सफर्ड ह्यांनी बुधवारींच दिला. आरोपी चातर्जी हे दोषी आहेत असें ठरवून किंग्सफर्डसाहेबांनीं त्यांस दोन वर्षांची सक्त मजुरीची कैद व एक हजार रुपये दंड व दंड न दिल्यास आणखी सहा महिन्यांची सक्त मजुरीची कैद अशी शिक्षा दिली.

बाबू बिपिनचंद्र पाल ह्यांची तुरुंगांतून ज्या दिवशीं सुटका व्हावयाची आहे त्या दिवशी गरिबसांस अन्नदान करुन सार्वजनिक सभा भरविण्याचा मद्रास नॅशनॅलिस्ट असोसिएशननें ठराव केला आहे.

झोंप घेण्यासाठीं किंवा जेवण वगैरे करण्यासाठीं आगगाड्यांना निराळे डबे जोडण्याची वहिवाट असल्याचें [illegible] फ्रान्समध्यें सड एक्सप्रेस नांवाच्या [illegible] आगगाडीला एक नाटकगृहाचा डबा नुकताच जोडण्यांत आला. ८० प्रेक्षकांची सोय होईल एवढें हें चालतें पाटकगृह प्रशस्त आहे. ऐहिक सुखांत भर घालण्याच्या हेतूनें सुधारलेलीं राष्ट्रें काय काय करतील याचा नेम नाहीं.

मि. कीर हार्डी हे प्रवास करीत करीत जोहान्सबर्ग येथें जाऊन पोंचले आहेत. स्टेशनावर लोकसमुदायांनीं त्यांच्यावर दगड, अंडी वगैरे शस्त्रांनिशीं हल्ला केला. पोलिसांनीं मि. कीर हार्डी यांच्या सभोंवतीं गराडा घालून त्यांना तेथून सुरक्षितपणें शहरांत नेलें. मि. कीर हार्डी यांच्यावर झालेला हल्ला हा गोऱ्या लोकांच्या परमतसहिष्णुतेचा पुरावाच आहे ह्मणावयाचा !

वऱ्हाडसमाचार

माघ व. ७ शके १८२९

## मध्यप्रांताची औद्योगिक स्थिति

हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांपैकीं सर्वांत महत्वाचा कोणता आहे आणि त्याची उन्नति कोणत्या तत्वांवर करतां येणें शक्य आहे याचें दिग्दर्शन गेल्या खेपेस केलें. इतर प्रांतांप्रमाणेंच आमच्या प्रांतांतही शेतकी हाच बहुतेक सर्व अशिक्षित रयतेचा धंदा आहे. पण शेतकीच्या आधारावर

किंवा तिच्याशीं ज्यांचा फारच थोडा संबंध आहे असे अनेक धंदे आमच्या प्रांतांत चालवितां होण्यासारखे आहेत. यामूळें आह्मांला जसें शेतीकडे लक्ष द्यावयास पाहिजे आहे तसेंच तें या इतर धंद्यांकडेही देणें जरूर आहे. हिंदुस्थानाच्या इतर कांहीं भागांतल्या प्रमाणेंच आमच्या प्रांताचीही औद्योगिक पहाणीच्या कामाला सुरुवात झाली असून सालअखेरीस नागपुर येथें औद्योगिक व शेतकी संबंधाच्या वस्तूंचें एक जंगी प्रदर्शन भरण्याचें नक्की ठरलें आहे. आमचे इलाखाधिपति ना. मि. क्रॅडाक यांचा व्यापार व औद्योगिक बाबतींतसंबंधांतील विचारांचें समालोचन आह्मी मागील खेपेस केलेंच आहे. लोकांमध्यें औद्योगिक प्रगतीसंबंधाची स्फुर्ति उत्पन्न करण्याच्या कामीं सरकार कशा रीतीनें मदत करतील हें त्यांच्या विचारांवरून स्पष्ट झालेंले आहे. मध्यप्रांत व त्याला जोडलेला आमचा वऱ्हाडप्रांत या मिळून होणाऱ्या प्रदेशांत कपाशीची जितकी लागवड होते तितकी ती हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही भागांत होत नाहीं. आमच्या प्रांताचें मुख्य शहर नागपूर येथें सर्व हिंदुस्थानांत उत्तम ह्मणून नांवाजलेली एंप्रेस मिल असून तिच्याच तोडीची दुसरी स्वदेशी मिल आतां पेटिट कंपनीच्या हातीं आल्यामुळें तिचीही एंप्रेस मिल प्रमाणें लवकरच उत्तम व्यवस्थेबद्दल प्रसिद्धी होईल अशी आशा वाटत आहे. सध्यां आमच्या प्रांतांत उत्पन्न होणाऱ्या कपाशीचा बहुतेक भाग मुंबईच्या बाजारांत खपतो, पण अलिकडे हें मान कमी होऊं लागलें आहे हें निःसंशय आहे पण गिरण्यास लागणाऱ्या कोळशाच्या खाणीजवळ आणि कपाशीचा पुरवठाही भरभक्कम या गोष्टीचा फायदा अद्याप कोणी घ्यावा तसा करून घेत नाहींत. नागपुराजवळच कोळशाची एक नवीनच खाण सांपडली असून नागपूर येथील सरकारी खाणीचें काम नुकतेंच सुरू होत आहे. अद्यापही कोठें कोठें कोळशाच्या व राकेलाच्या खाणी सांपडतील याविषयीं तज्ञांचे तर्क चालू आहेत. नागपूर जिल्ह्यांतील मँगेनाइजच्या खाणीपर्यंत रेल्वे किंवा ट्राम्वे यांचे फांटे झाले आहेत. भंडारा, बालाघाटचा पश्चिमभाग या जिल्ह्यांतील कोळशांच्या खाणी व टाटा कंपनीच्या कोळशाच्या खाणी यांच्या पर्यंत अद्याप रेल्वे किंवा ट्राम्वेचे फांटे होऊन त्यांचा रेल्वेच्या हमरस्त्याशीं संबंध जुडण्याला अद्यापि आवकाश आहे. मध्यंतरी मँगेनीजच्या खाणींतून बेसुमार माल बाहेर पडला. एका कंपनीला तर केवळ सहा महिन्यांच्या मुदतींत पंधरा लक्ष रुपये नफा झाला. इतर खाणींच्या मानानें मँगेनिजच्या खाणीचें काम श्रमाचें व खर्चाचें असल्यामुळें भांडवलावर सपाटून नफा पडतो यांत आश्चर्य नाहीं. नागपुराजवळच वूल्फरामाइट नांवाच्या नवीनच एका धातूची खाण लागली असून त्याची किंमत सध्यां एका टनाला रु० १८०० वर येते. सध्यां ही धातु फक्त आगरगांव नजीकच्या एका खाणींत सांपडली आहे. तथापि ती मध्यप्रांतांत आणखीही कांहीं ठिकाणीं सांपडेल असा अजमास आहे. या वूल्फरामाईटचा अत्युतम पोलाद करण्याचें आणि इतर कामीं उपयोग होतो. आतां पर्यंत ह्या खाणींच्या उद्योगाचा युरोपियन लोकांनीं बहुतेक मक्ताच घेतला होता. पण आतां ती स्थिति बदलून आमच्या देशी व्यापाऱ्यांचें लक्ष या गोष्टींकडे जात चाललें आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे. मँगेनिजची एक खाण तर निव्वळ देशी व्यापाऱ्यांच्या कंपनीच्या हातीं असून तेलाच्या गिरण्या व आगपेट्यांचे कारखाने इत्यादि बाबींकडे देशी व्यापारी जास्त लक्ष देऊं लागले आहेत. एका देशी व्यापारी गृहस्थाच्या मतांत सातपुड्यावरून निघणाऱ्या नद्या नाले आडवून त्यांच्या पाण्याच्या शक्तीवर वीज उत्पन्न करण्याचीही कल्पना आलेली आहे. याप्रमाणें आमच्या प्रांताची औद्योगिक स्थिति सध्यांच्या घटकेलाही अगदींच निराशा जनक नाहीं. तथापि अद्याप आपलें क्षेत्र केवढें मोठें आहे याचा अदमास बरोबर लागलेला नाहीं. तो लागला ह्मणजे कोणत्या भागांत किंवा गांवी कोणत्या उद्योगाला सोईची परिस्थिति आहे याची पहाणी झाली ह्मणजे भांडवलवाले लोक व उद्योगप्रिय कुशल कारागीर यांना आपल्या कर्तृत्वाला हवी तशी वाव सांपडेल. नागपूर येथील प्रदर्शनही या बाबतींत बरेंच उपयुक्त होईल अशी उमेद आहे. या प्रदर्शनांत प्रांतांतील निरनिराळ्या ठिकाणाहून जे जिन्नस तयार होऊन येतील त्यांवरून देखील कोठे कोणता उद्योग चालण्यासारखा आहे, कोठच्या लोकांच्या कौशल्याला किंवा उद्योगप्रियतेला उत्तेजन आणि सांपत्तिक सहाय्य करण्याची जरूर आहे, हें कळून येईल. अशा रीतीनें औद्योगिक पहाणी व प्रदर्शन यांच्या सहाय्यानें आमच्या प्रांताच्या औद्योगिक स्थितीविषयीं विश्वसनीय माहिती कळून औद्योगिक मार्ग स्पष्टपणें दिसून येईल असा आह्माला भरंवसा आहे.

---

## कपाशी.

### मि० क्लाउस्टन यांचा निबंध

(मा. अ. पु. चा.)

जडी जातीपैकीं भरड जात जशी तलम जातीला मागें टाकीत चालली आहे, त्याचप्रमाणें एकंदर जडी जातीचें मिश्रण बनी जातीला मागें टाकीत आहे. बनी अथवा घाट जातीच्या कपाशीचा धागा लांब असून रेशमासारखा तुकतुकीत असतो. हा धागा १ लांबीचा असतो; जडीच्या भरड जातीचा १/२ असतो. सन १८७८ मध्यें वऱ्हाडांत बनी जातीची कपाशी १९९८४२६ एकर जमिनींत लावलेली असून जडी जातीची पेरणी ६२९६९३ एकर जमिनींत झालेली होती. सन १९०६ मध्यें २२९८३२० एकर जमिनींत जडी असून फक्त ६३९९८० एकर जमिनींत बनी होती. बनीच्या पेरणीचें मान मध्य प्रांतांत तर याहीपेक्षां कमी झालें आहे. गतवर्षी कपाशीचा पेरा १९३६९०० एकर जमिनींत झाला होता. त्यापैकीं फक्त ९८०११ एकर जमिनींत बनी जातीची कपाशी होती. या कपाशीला पूर्वी हिंगणघाट किंवा घाटकपास असें ह्मणत असत. हें वर सांगितलेंच आहे. आणि हिंदुस्थानांत सूत काढण्याचा किंवा कापड विणण्याचा प्रघात विशेषसा होण्यापूर्वी या कपाशीच्या जातीची प्रसिद्धी झालेली असून त्यावेळीं ती विलायतेस फार रवाना होत असे. या जातीचें निर्भेळ बीं लावलें तर या कपाशीचें नंबर ४० पर्यंत सूत निघत असे. सध्यां या जातीची लागवड पश्चिमेस नेमाडापासून पूर्वेस चांद्यापर्यंतच्या अर्धचंद्राकृति भागांत होते. या भागांत वऱ्हाडपैकीं बुलठाणा, यवतमाळ व आकोल्याचा कांहीं भाग, आणि मध्यप्रांतापैकीं नेमाड, वर्धा व चांदा यांचा कांहीं भाग, एवढा प्रदेश येतो. चांदा जिल्ह्यांत या जातीची कपाशी रबीचे हंगामांत लावतात व त्यावरतांत तिला रबीची जडी असें नांव देतात. नेमाडांत तिला नेमाडी ह्मणतात. वर्धा जिल्ह्यांतील हिंगणघाट तहशिलींत ही जात फार होत असे, त्यावरून त्या भागांत तिला हिंगणघाट असे ह्मणतात. आणि वऱ्हाड व निजामशाही यांत तिला घांट कपास असे ह्मणतात. हा बहुतेक प्रदेश रेल्वेपासून ३० ते १०० मैलांवर आहे. वर्धा, चांदा किंवा नेमाड याप्रमाणें जेथें रेल्वेचे नवीन रस्ते झालेले आहे तेथें बनीच्या प्रदेशांत जडीचा प्रवेश फार जोरानें होत आहे आणि सध्यां तेथें उत्पन्न होणाऱ्या कपाशींत जडीची पुष्कळच भेसळ असते. रेल्वे वगैरे हमरस्त्यांपासून जास्त दूर अशा ठिकाणीं अद्यापि निर्भेळ अशा बनी जातीची कपाशी होते. सध्यां आकोल्याच्या बाजारांत जी अति उत्तम कपाशी येते ती पैनगंगेच्या पलीकडील निजामशाहींतील मुलखांतून व वाशिम तालुक्यांतून आलेली घाट कपास असते. बनी जातीचा कपास ज्या प्रदेशांत होतो तेथें जडी जातीची लागवड केल्यास जास्त फायदेशीर होईल कीं काय असा प्रश्न विचारण्यांत येत असतो. या भागांत जडी पेक्षां बनी कपाशीला खंडी मागें २ किंवा ३ रुपये जास्त देतात. आणि साधारण दिवसांत बनी जातीपेक्षां जडी जातीचें पीक कांहींसें जास्त येतें, आवर्षणाच्या किंवा अतिवृष्टीच्या दिवसांत तर तें विशेषच जास्त येतें, या गोष्टी ध्यानांत घेतल्या ह्मणजे सध्यांच्या भावांत जडी जातीची कपास जास्त फायदेशीर होईल असें वाटतें. बनी जातीची कपास लावणारे इतर शेतकऱ्यांप्रमाणेंच पुराणप्रिय लोक असतात; त्यांना दुसरी जातच माहित नसते आणि दुसरी एखादी जात फायदेशीर पडत असली तर ते लवकर ती पेरावयास लागावयाचे नाहींत.

या प्रांतांत होणारी आणखी जात ह्मणजे अपलँड जॉर्जिअन ही होय. ही तीस वर्षांपूर्वी इकडे प्रथम आली असून आतां येथील हवामान वगैरे तिला अनुकूल असें जमलें आहे. या जातीच्या कपाशीचा धागा बनीच्या धाग्याइतका लांब असून त्याचें नं. ४० पर्यंत सूत निघेल, पण या कपाशीच्या धाग्याच्या अंगचा सरदटपणा कमी झालेला आहे. सध्यां या जातीच्या निर्भेळ कपाशीच्या लागवडी खालीं या प्रांतांत असलेली जमीन १०० एकरांपेक्षां जास्त नाहीं. नागपूर येथील प्रयोग क्षेत्रांत ज्यांचे प्रयोग करून पाहिले त्या कपाशीच्या जाती, ह्मणजे देवकापूस, इतर प्रांतांत होणाऱ्या कांहीं हंगामी जाती आणि परदेशांतून आलेल्या जाती या होत. देवकपाशीच्या ज्या ज्या जातीचे प्रयोग करून पहाण्यांत आले त्यांपैकीं एकांतही यश आलें नाहीं; कांहीं जातींचे प्रयोग चालूं आहेत. इतर प्रांतांतील स्थानिक जातीपैकीं ज्यांचे प्रयोग करून पाहिले त्यांपैकीं एक देखील फायद्याच्या बाबतींत इकडील जातीच्या बरोबरीचा दिसून आला नाहीं. तलम धाग्याच्या कपाशीच्या तयार होण्यास ७-८ महिने लागतात आणि ह्मणून पावसाळा जेथें थोडे दिवस चालतो अशा या आपल्या प्रांतांत, वर सांगितलेल्या कारणांकरितां त्या उपयोगी नाहींत. लवकर तयार होणाऱ्या आंखुड धाग्याच्या निग्लेक्टम्स पैकीं कांहीं जाती इकडे चांगल्या येतात. पण जडी पेक्षां त्यांचें पीक कमी येत असून धागा तितकाच भरड असतो. अद्याप ज्यांना इकडील हवामान अनुकूल झालेलें नाहीं अशा ज्या अमेरिकन, अफगाण व इजिपशियन जातीचे प्रयोग करून पाहिले किंवा ज्यांचे प्रयोग सध्यां चालू आहेत त्यांच्या संबंधानें यश येण्याची आशा दिसत नाहीं. एप्रिल किंवा मे महिन्यांत कालव्याच्या किंवा विहिरीच्या पाण्यावर इजिपशियन जातीची लागवड करून पाहिली; त्या कपाशीला कमताकद असा धागा येत असून त्या पिकापासून फायदा पडत नाहीं असें दिसून आलें. या कपाशीच्या अनेक जातींचा अनुभव घेऊन पाहिला. त्या वरून असें दिसून आलें कीं ज्या जातीला तयार होण्यास ७-८ महिने लागतात ती पावसाळ्याच्या पूर्वी पेरल्याशिवाय सोय नाहीं. पण कालव्याचें पाणी ज्या भागांत तयार होतो तेथेंच मिळणें शक्य असल्यामुळें आणि तेथें पावसाचें मान जास्त असल्याकारणानें तेथील हवामान कपाशीला मानवण्यासारखें नसल्यामुळें, अशा प्रकारच्या जातीची लागवड करणें कितीही इष्ट असलें तरी अशा जातीचा प्रसार चालू होण्याचा संभव अगदीं कमी आहे.

येथील हवामान ज्यांना मानवलें आहे अशा परदेशी जातीपैकीं आतांपर्यंत ज्यांचे प्रयोग करून पाहिले अशामध्यें बरी जातीसंबंधानें सर्वांत जास्त आशा आहे. ही जात अमेरिकन अपलँडपैकीं असून तिला इकडील हवामान मानवलें आहे. या जातीचें बीं इन्स्पेक्टर जनरल ऑफ अग्रीकल्चर यांच्या मार्फत बंगाल्यांत अडीच वर्षांपूर्वीं आणविलें. ह्या जातीची कपाशी बंगाल्यांतील संथाळ परगण्यांत बरेच दिवसांपासून लागवडींत असून तिला बरी असें नांव आहे. तेथें ज्या परदेशी जाती लावून पाहिल्या त्या सर्वांत ही उत्तम ठरली आहे. ही जात नागपूर येथील सरकारी शेतांत गेलीं दोन वर्षें लावून पाहिलेली असून तिला चांगलीं मोठालीं बोंडें येतात आणि या कपाशीचा धागाही चांगला असतो. गतवर्षी या जातीचें थोडें थोडें बीं बऱ्याच शेतकऱ्यांना दिलें होतें. पुढील हंगामांत या कपाशीचा मोठ्या प्रमाणावर

अनुभव घेऊन पहाण्याची त्यांची इच्छा असल्यामुळें त्यांनीं या कपाशीचें बीं मिळेल तितकें मागविण्याची सुरवात केली आहे. शास्त्रीयदृष्ट्या ही जात अपलँड जॉर्जिया सारखीच असते, पण तिच्यापेक्षां तीन आठवडे उशीरां तयार होते. ह्मणून आमच्या प्रांतांतील थोड्या मुदतीच्या पावसाळ्याला ती सोईची आहे. एंप्रेस मिलचे मॅनेजर खा. ब. बेझनजी यांनीं बरीचें पीक वाढत असतांना तपासलें असून त्यांच्याकडे सरकारी शेतांत केलेल्या कपाशीच्या निरनिराळ्या जातींचे नमुने पहावयास पाठविले होते. या नमुन्यांत वेंचक व निवडक केलेले असे अपलँड जॉर्जिया व बरी जातींचे नमुने पाठविले होते त्यांची परीक्षा करून एकएकाचें महत्व ठरवितांना बरी संबंधानें खा. ब. बेझनजी ह्मणतात, 'सर्वांत उत्तम सूत बरी जातीच्या कपाशीचें दिसून आलें. त्या जातीकडे अतिशय लक्ष द्यावयास पाहिजे त्या कपाशीचा धागा फुली गुड मिडलिंग अमेरिकन कपाशीच्या धाग्याइतका चांगला असतो. दर एकरीं कपाशीचें मान बरेंच जास्त पडेल असें मला वाटतें आणि या जातीची लागवड उत्तम रीतीनें करतां येऊं लागली तर लवकरच बीमोड होऊन तिच्या जागीं ही जात येईल. त्यांनीं असा अदमास केला कीं बरी कपाशीचें सूत नं. ४० पर्यंत निघेल. या कपाशीचा भावही त्यांनीं अंदाजानें बसविला, तो असा कीं ३४९ पौंडांच्या खंडीला मद्रासी कपाशीला रुपये ९० आणि बनी जातीला रु. १३० भाव असला तर बरी कपाशीला रु. १५० भाव यावा. अपलँड जॉर्जिआपैकीं वेंचक मालाचा भाव बिननिवडीच्या मालापेक्षां रु. ५ नी जास्त येईल असा अदमास आहे.

(पुढें चालू)

---

## कायदे कौन्सिलांतील अधिकारी वर्गाचें मताधिक्य

राज्यव्यवस्थेंत फेरफार करण्यासाठीं ज्या योजना हिंदुस्थान सरकारनें तयार करून सध्यां प्रांतिक सरकारांकडे अभिप्रायासाठीं पाठविल्या आहेत त्यांच्या मुळाशीं असलेल्या तत्वांसंबंधानें हिंदुस्थानाच्या सर्व प्रांतांतील लोकमत सर्वांशीं विरुद्ध आहे हें प्रसिद्धच आहे. कायदेकौन्सिलांत अधिकारी वर्गाचें मताधिक्य असावयाचें हें या योजनांतील एक गृहीततत्व आहे. या तत्वाचा जरा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर असें दिसून येईल कीं कायदेकरणाऱ्या मंडळांत कायदेअंमलांत आणणाऱ्या अधिकाऱ्यांचें मताधिक्य असणें ही गोष्ट मुळींच योग्य नव्हे. या तत्वाचा अंगिकार करणें ह्मणजे कायदेकौन्सिलांच्या स्थपनेच्या हेतूचा विपर्यास करणें आहे. मद्रासचे ना. मि. व्ही. कृष्णस्वामी अय्यर यांनीं नुकतीच हिंदुस्थान सरकारच्या योजनांवर एक विस्तृत टीका केलेली आहे, तींत हा मुद्दा प्रमाणशिर रीतीनें पुढें आपला आहे. कायदे करणाऱ्या मंडळांत अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या नेहमीं जास्त ठेवल्यानें काय स्थिति होते याचें वर्णन करतांना मि. अय्यर ह्मणतात, 'या पद्धतीप्रमाणें सरकारी अधिकाऱ्यांना सरकारच्या कलाप्रमाणेंच मत देणें नेहमीं भाग पडतें हा या पद्धतींतला मोठा दोष आहे. एखाद्या प्रश्नावर वादविवाद चालूं असतां सरकार आपला कल वेळोवेळां बदलत जातें अणि त्यांच्या मागून अधिकारी सभासदांनाही त्या त्या वेळीं आपलीं मतें बदलावीं लागतात, असा प्रकार बरेच वेळां अनुभवास येतो आणि तो कायदे करणाऱ्या मंडळीच्या इभ्रतीस कमीपणा आणणारा असतो. युरोप, अमेरिका या खंडांतील सुधारलेल्या देशांतील राज्यपद्धतीमध्यें देखील ही पद्धती चालूं आहे तेव्हां ती हिंदुस्थानांतच त्याज्य कां मानावी? असा प्रश्न कोणी विचारील पण यावर असें उत्तर देतां येतें कीं त्या देशांत ज्या पक्षाचें मताधिक्य असेल त्या पक्षाच्या हातीं राज्य कारभार असतो. एखाद्या सभासदाला आपल्या पक्षाच्या प्रमुखांचीं मतें मान्य नसलीं तरी त्याला तीं बदलतां येतात. पण हिंदुस्थानांतील अधिकारी वर्गाला मत बदलतां येणें शक्य नाहीं. कारण तसें केल्यास त्याला आपल्या चरितार्थाच्या आधारावर पाणी सोडावें लागेल. अशा रीतीनें मारून मुटकून वैद्यबोवाच्या सारखे सभासद कायदेकौन्सिलांत असून नसून सारखेच नव्हेत काय? बळेंच शेंदूर फासून बनविलेले हे देव कायदेकौन्सिलात स्वतंत्रपणें मत देऊं शकणाऱ्या सभासदांपेक्षां नेहमीं जास्त ठेवणें ह्मणजे कायदेकौन्सिलांत सभासदांचीं मतें घेणें, किंवा सभासदांची निवड करणें इत्यादि प्रकारांची केवळ टवाळी करणें होय. सध्यांच्या या स्थितीला कायद्याचा देखील आधार नाहीं असें मि. कृष्णस्वामी अय्यर यांचें ह्मणणें आहे. कायदेकौन्सिलांच्या संबंधाच्या कायद्यांत असें सांगितलें आहे कीं बिनसरकारी जादा सभासदांची संख्या एकंदर सभासदांच्या संख्येच्या निम्यापेक्षां कमी असूं नये. ह्मणजे वेळेस बिनसरकारी सभासदांची संख्या पूर्ण संख्येपर्यंत देखील राखणें शक्य होईल, अशी तजवीज कायद्यांत आहे. आतांची स्थिति आणि सध्यां पुढें आलेल्या योजनांतील व्यवस्था या कायद्याशीं स्पष्टपणें विरुद्ध आहेत. कायदे करण्याच्या बाबतींत शेवटचा अधिकार सरकाराकडे असावा येवढ्यासाठीं कायदेकौन्सिलांत अधिकारी सभासदांचें कायमचें मताधिक्य ठेवणें हें किती चमत्कारिक आहे! तसें करण्याला निराळे मार्ग आहेत. कायदेकौन्सिलांनीं केलेल्या कायद्यांना मजूरी देणें किंवा न देणें हें सरकारनें आपल्या हातीं ठेवल्यानेंही तो हेतू सिद्धिस जाईल. फक्त शेवटची मंजुरी सरकाराच्या हातीं राहिली ह्मणजे सरकारी सभासदांना आतांपेक्षां युक्तिवाद जास्त करावा लागेल. आणि मग सरकार लोकमताला किती मान देतें हें पदोपदीं कळून येत जाईल. आतांच्या स्थितींत किंवा सध्यां सुचविण्यांत आलेल्या फेरफारांत लोकमताच्या नाड्या अगोदरच आंखडून ठेवलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्याचे बाबतींत आज वीस वर्षे जो अनुभव येतो तोच कांहीं काळानें कायदे कौन्सिलांसंबंधानेंही येणार हें या चिन्हांवरून स्पष्ट दिसतें. आणि त्या दोषाचें खापर सध्यांच्या स्थानिक स्वराज्यांतील अपयशाप्रमाणें सरकार लोकांवर फोडूं पहाणार हें निश्चित आहे.

---

## पबना परिषद काय शिकविते?

पबना येथील प्रांतिक परिषदेच्या बैठकीला सुमारें पंधरा दिवस होत आले. या सभेंत काय काय प्रकार घडले याची इत्थंभूत हकीगत आतां प्रसिद्ध झाली आहे. सुरतेस राष्ट्रीय सभेमध्यें झालेल्या बेबंदशाही मुळें उत्पन्न झालेलें द्वैत बुजवून टाकण्याला बंगालच्या देशभक्तांनीं उपक्रम केला ह्मणून सर्वतोमुखीं त्यांची स्तुति ऐकूं येत आहे. इतर प्रांतांतील लोकांनीं बंगालकरांचा कित्ता आपल्यापुढें ठेवावा ह्मणून सर्व बाजूंनीं सूचना झाल्या आहेत. बोध कोणा पासूनही घ्यावा आणि घेतांना वाइटापेक्षां चांगल्याकडे नेहमीं नजर ठेवावी असें सुभाषित आहे. या दृष्टीनें बंगालकरांची कृति इतर प्रांतांतील लोकांस परस्परांविषयींचा द्वेष सोडून देण्यास सहाय्यकारी होईल तर मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. पण बोध घ्यावयाचा तो दोन प्रकारचा असतो. कांहीं गोष्टी शिकावयाच्या असतात आणि कांहीं गोष्टी आचरणांत टाळावयाच्या असतात. अशा या दोन्ही प्रकारचा बोध पबनाच्या परिषदेपासून घेतां येण्यासारखा आहे. बंगालकरांनीं ऐक्यासाठीं शक्य तितके प्रयत्न करून इतरांस मार्ग दाखवून दिला याबद्दल आह्मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतो; पण त्याच वेळेस बंगालकरांचे जे कांहीं दोष पबना येथें दिसून आले त्यापासून दूर रहाण्याविषयीं आमच्या बांधवांस प्रार्थना करतांना आह्माला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. यंदा बंगाल्यांत काय किंवा इतर कोणत्याही प्रांतांत काय डोक्याची जरूरी विशेष भासूं लागली याला सुरतेस घडलेला लांछनास्पद प्रकार कारण आहे. हें कोणालाही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. बंगालकरांनीं सुरतेस बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा आरडा ओरड करून जो अपमान केला तो एका तत्वांवर होता असें त्यावेळीं प्रतिपादण्यांत आलें होतें; पण त्यानंतर पुरते दोनच महिने झाले असतील नसतील इतक्यांत सुरेंद्रबाबूंची उपदेशवाणी सर्व बंगाली देशभक्तांनीं एकाग्रचित्तानें ऐकून घेतली; त्यावेळीं तें तत्व कोठें गेलें! दोन महिन्यापूर्वीं ज्यांचें भाषण कोणी ऐकूं नये इतक्या कमी महत्वाचे सुरेंद्रबाबू ठरले होते; आज तेच सर्वांना अधिकारयुक्त भाषेनें उपदेश करण्यास योग्य मानले जातात. यांतील अर्थ काय? एका वर्षापूर्वीं सुरेंद्रांवर हव्या तशा कडक टीकेचा भडिमार करून थोड्याच वेळांत श्रीयुत पाल यांनीं एके समयीं जाहिर रीतीनें त्यांच्या पायावर लोळण घेतली होती. गेल्या पांच चार वर्षांत जन्मास आलेला नवा पक्ष अस्तित्वांत येण्याचीं चिन्हेंही दिसत नव्हतीं तेव्हां जहाल ह्मणून प्रसिद्ध असलेले मोतीलाल बाबू प्रिन्स ऑफ वेल्स यांच्यापुढें अगदीं क्षुद्र अशा 'जो हुकूम' दरबाऱ्यास शोभेल असें वर्तन करण्यांत प्रवृत्त झाले होते. अशा परस्पर विरुद्ध प्रकाराची यादी बंगालच्या संबंधानें हवी तेवढी वाढवितां येईल. पण या उदाहरणांचा निर्देश करण्याचा हेतु केवळ छिद्रान्वेषणाचा नसल्यामुळें तसें करण्याचें प्रयोजन नाहीं. बंगालकरांचा हा विसंगतपणाचा विलक्षण गुण त्यांना वेळेस कोणत्या थरावर नेऊन पोहोंचवील याचा नेम नसतो. सुरतेस जातांना नेमस्त पक्षाच्या पुढाऱ्यांविषयीं अनुदार किंवा आकुंचित दृष्टी ठेवण्याची लाट पसरली होती. तेथेंहि जे अनिष्ट प्रकार घडले त्यांना सुरवात केल्याचें श्रेय बंगालकरांनाच देण्यांत येत असतें. सुरतेस द्वैताचा अतिरेक झाल्यावर पुनः ऐक्याची कल्पना उगम पावली तेव्हांही बंगालकरांची सर्वांत आघाडी आहेच. जशी लाट उसळेल तसें वर्तन करण्यांत रतीभर कसूर करावयाची नाहीं हा बंगालकरांचा एका दृष्टीनें मोठा आदरणीय सद्गुण आहे. पण तोच प्रसंग विशेषीं केवढा ढोबळ दुर्गुण होऊन बसतो! पबनाच्या परिषदेंत जें ऐक्य दिसून आलें तें बऱ्याच अंशानें या गुणामुळें होय ह्मणून बंगाली बंधूच्या ऐक्यप्रियतेचा धडा शिकतांना त्यांच्या या गुणाचा स्वीकार फक्त हितकर तेवढाच करावा अशी शिफारस करणें आह्माला अवश्य दिसतें. निदान पुढारी ह्मणविणाऱ्यांनीं तरी चंचल मनोवृत्तीच्या तड्याक्यांत सांपडूं नये. बहुजन समाजाकरवी जेव्हां एखादें महत्कार्य करून घ्यावयाचें असतें तेव्हां त्यांच्या मनोवृत्ती तशीच मोठ्या वेगानें उंचबळत असल्या पाहिजेत हा सिद्धांत सर्वस्वी सत्य आहे. पण लोकसमुदायाला वळण लावणारांनीं किंवा त्यांचें सेनानित्व पतकरणारांनीं आपलें मन उत्कट विकारापासून अलिप्त ठेवल्यावांचून गत्यंतर नाहीं. लोकांच्या मनोवृत्तीवर लोकांचा नव्हे, तरी पुढाऱ्यांचा ताबा पूर्णपणें राहिला पाहिजे. सुरतेस जे अनिष्ट प्रकार घडले त्याचें कारण अशा रीतीनें दाखवून देतां येतें. गतगोष्टीचा शोक करीत बसण्यापेक्षां पुढचा मार्ग शोधून काढून तो आक्रमूं लागणें हें जास्त श्रेयस्कार असतें. ह्मणून असें करूं जातांना पबनाच्या परिषदेचा प्रकार सर्वांनीं आपल्या नजरेसमोरून कधींही हालूं देतां उपयोगी नाहीं.

---

## 'लोजर कथा'

पबना परिषदेंत बंगाली देशबंधुंचे जसे कांहीं सद्गुण दिसून आले तसेच त्यांच्या पैकीं कित्येकांच्या अंगचा एक मोठा दुर्गुण दिसून आला. या दुर्गुणाचा बंगालकरांकडेच मक्ता नसून इतर प्रांतस्थ देशबांधवांतीलही कित्येकांत तो ठळकपणानें आहे ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. पबना परिषदेच्या विषयनियामक मंडळीच्या बैठकींत स्वराज्यासंबंधाच्या ठरावांवर मोठा कडाक्याचा वादविवाद झाला. कलकत्त्याच्या ठरावाअन्वयें वसाहतींच्या धर्तीवरील स्वराज्य असे शब्द या ठरावांत असावे असें बऱ्याच मंडळींचें मत होतें. बाबु मनोरंजनगुहप्रभृति कांहीं मंडळी स्वराज्य या शब्दामागें कांहीं उपाधी नको ह्मणणारी होती. उभयपक्षांच्या सभासदांची संख्या

पाहिली तेव्हां पहिल्या मताला बरचसें बहुमत अनुकूल दिसून न आल्यावरून त्याच प्रमाणें ठराव परिषदेसमोर मांडण्याचें ठरले. वास्तविक पहातां आतां विरुद्ध पक्षाला कांहीं बोलण्याला अवकाशच उरला नाहीं. पण आपलें मत आपण उघड सभेंत नुसतें कथन करूं, आणि परिषदेपुढें आलेला ठराव आपल्याला व आपल्या अनुयायांना मान्य नाहीं असें जाहिर करूं या पेक्षां जास्त कांहीं आपल्याला कर्तव्य नाहीं असें अश्वासन बाबू मनोरंजन गुह यांनीं दिलें' होतें. पण तें आपलें वचन विसरून जाऊन बाबू गुह यांनीं सभेंत ठरावासंबंधानें आपली नापसंती जाहिर करतांना त्या ठरावावर सर्व सभासदांचीं मतें घ्यावीं असा हट्ट धरला. पण त्यांच्या मताचे सर्व पुढारी व बरेचसे साधारण दर्जाचे लोक आपल्या वचनाला हरताळ लावण्यास तयार नव्हते. त्यांनीं आपलें मत कोणत्याच बाजूला दिलें नाहीं. मनोरंजन बाबूंच्या मताची मंडळी सभेंत विशेष नव्हती हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या विरुद्ध बहुमत पडून मूळचा ठराव पसार झाला. पण मनोरंजन बाबूंच्या या कृत्याचा अध्यक्ष बाबू रवींद्रनाथ टागोर यांनीं आपल्या शेवटच्या भाषणांत 'लाजेर कथा' लज्जास्पद गोष्ट अशा शब्दांनीं उल्लेख केला ! अशा 'लाजेरकथा' आमच्या राजकीय संस्थांतून हमेषां घडतात आणि हेंच आमच्यांतील प्रखर द्वैताचें एक प्रमुख कारण आहे.

## नागपूरचें प्रदर्शन

या प्रदर्शनाच्या पूर्व तयारी निमित रा. रा. सी. ई. लॉसाहेब शेतकी खात्याचे डायरेक्टर हे मुद्दाम येथें गेल्या तारखेला आले होते हें पूर्वींच कळविलें आहे. यांच्याकडे औद्योगिक सर्व्हेचें काम देण्यांत आलें आहे. आणि सध्यां ते प्रदर्शनाच्या व सर्व्हेच्या कामांत अगदीं निमग्न आहेत. हे गृहस्थ प्रेमळ असून मोठ्या कळकळीनें काम करित असतात. आणि ह्मणूनच वरील दोन्ही गोष्टी उत्कृष्टपणें पार पडतील इतकेंच नव्हे तर त्यापासून कायमचा लोकोपयोग होईल असें आश्वास वाटतें. प्रदर्शना निमित येथें रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार यांच्या अध्यक्षतेखालीं या जिल्ह्याची जाहिर सभा गेल्या दहाव्या तारखेस भरली होती तेव्हां कांहीं गृहस्थांनीं जो दानशूरपणा दाखविला तो पाहून राजश्री लॉसाहेब फार खुष झाले. आणि कार्य प्रसंगानें आपल्या मेहनतीचें या वऱ्हाडच्या भुमीवर मोठें चीज होईल असेंही त्यांस वाटलें असावें. त्यांनीं सायंकाळीं मुद्दाम कांहीं गृहस्थांस बोलावून वऱ्हाडांतील औद्योगिक पहाणीचें काम करितांना कोण कोणते हुन्नर धंदे विशेष उर्जित दशेस आणण्यासारखे आहेत हें पाहण्याकडे लक्ष पुरविण्यास आग्रहाचें कळविलें. असे धंदे शोधून काढावे कीं ते धंदे त्या त्या स्थळीं राजाश्रय व लोकाश्रय एकत्र झाले असतांना चांगल्या संपन्नावस्थेला पोहोचतील आणि त्यामानानें लोकांची स्थिति अधिकाधीक उन्नत होत जाईल.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान—थंडीचें मान जास्त प्रमाणावर आहे. आणि दिवसा उष्णताही अधिक भासते. हिवाळ्याचें संक्रमण होऊन वसंताच्या रम्य ऋतुला प्रारंभ होण्याच्या पुर्वीचा हा संध्या कालच होय. रोगराई सध्यां मंदावत चालली आहे व प्लेगचेंही मान बुलढाणा जिल्हा खेरीज करून इतरत्र कमी आहे.

व्याख्यानः— रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं गेल्या शनिवारपासून एका सप्ताहिक व्याख्यानमालेला प्रारंभ केला आहे. परवा सायंकाळीं प्रस्तुतचें कर्तव्य या विषयांवर त्यांनीं आपले विचार प्रगट केले. ते फार कळकळीनें बोलले आणि सांपतिक शिखरांपासून घसरंडीस लागलेल्या इंडिया सारख्या राष्ट्राचा मोर्चा असा बदलेला पाहिजे कीं ज्याच्या योगानें ब्रिटिश राज्याच्या व्यापारी तत्वाप्रमाणेंच आपला देशही पूर्ववत् सुंसपन्न होईल. ही स्थिती आणण्याला सर्व लोकांनीं स्वदेश, बहिष्कार इत्यादि साधनें जवळ करितांना अत्युतम कोटीची ईश्वरनिष्ठा ठेवावी आणि प्रामाणिकपणानें व मानसिक धर्यानें चालावें ह्मणजे सर्व राष्ट्रास 'जागो जागो' असें निराळें विदित करण्याचें प्रयोजन सरकारला व लोकांना राहणार नाहीं.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार डेप्युटी कमिशनर हे येत्या महिन्यांत वर्ष सव्वा वर्षाच्या रजेवर जाणार आहेत. आणि त्यांच्या रजेत रा. रा. एल. ई. पी ग्यासकिन हे येथें डेप्युटी कमिशनर होतील.

रा. रा. माणिकशा रतनजी दस्तूर यांची रजा संपतांच भंडारा येथें त्यास डिस्ट्रिक्ट जज्ज नेमल्या अन्वयें ते तिकडे परभारेंच दाखल झाले. वऱ्हाडांतील जुन्या, प्रामाणिक व लोकप्रिय अधिकाऱ्यांपैकीं हे असून त्यांची भंडाऱ्याकडे बदली झाल्यामुळें पुष्कळांस वाईट वाटलें.

ज्या पांच गृहस्थांस पहिल्या जानेवारी पासून एक. असि. क. वर्ग ७ च्या दर्जावर कायम करण्यांत आलें आहे त्यापैकीं वऱ्हाडचे दोन गृहस्थ आहेत. रा, रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. व रा. रा. रघुवीरसिंग दुनियासींग.

रा. रा. रामचंद्र नारायण साठे तहशिल्दार वाशिम यांस ३ महिन्याची हक्काची रजा मिळाली असून त्यांच्या जागीं तेथील नायब तहशिल्दार रा. रा. अमृत गोपाळ देशपांडे अडगांवकर यांस नेमलें आहे.

वऱ्हाडांतील तेरा नायब तहशिल्दार मंडळीस म्याजिस्ट्रेट वर्ग तीनचे अधिकार देण्यांत आले आहेत. या व्यवस्थेनें तहशिल्दार मंडळीवरील कामाचा बोजा बराच हलका होईल.

बेंच म्याजिस्ट्रेट उमरावती तालुका व दर्यापूर तालुका या दोहोंसाठीं अनुक्रमें पांच गृहस्थांचें व चार गृहस्थांचें असें बेंच नेमण्यांत आलें आहे.

पहिल्या बेंचांतील गृहस्थांचीं नांवें

रा० रा०

गुलाम मुर्तिजा शेखगुलाम जाहगीरदार

आनंदराव बळवंतराव देशमुख

अबदुल समत अबदुल गनी

रीयासत अली जहागीरदार

हौजदारखा महमद सुलेमानखा

दुसरे बेंचांतील गृहस्थांचीं नांवें

रा० रा०

महमदअली जाहगीदार

तुकाराम नरोबा

यशवंत भिकाजी.

नागोराव शंकरराव.

रा० रा० इ० एम् किर्नआन्डर ए. असि० क० नागपूर यांस उमरावती येथें बदलण्यांत आले आहे.

बुसरचा खून.—बुजर येथील चिट्टू महाराला गोळी घालून मारल्याबद्दल सर्व्हेवाल्याचे रा० रा० किन्ही यांजवर येथें मुकदमा चालूं आहे. या कामाकरितां रा. रा. किर्नॲन्डर म्याजिस्टेट साहेब यांस येथें मुद्दाम पाठविलें आहे या खटल्यामध्यें आतां असें निष्पन्न होत आहे कीं आरोपीवर बरीचशी गांवकरी मंडळी हल्ला करून गेली आणि निरुपायास्तव प्राणरक्षणार्थ त्यास अशा रीतीनें बंदूक झाडणें भाग पडलें. आरोपी हे अगदीं तरुण गृहस्थ आहेत तथापि त्यांनीं आपला शांतपणा अखेरीची घटका येई पर्यंत कायम राखला होता असें ह्मणतात या प्रकरणाचा निकाल येत्याच आठवड्यांत होईल असें वाटतें.

---

## नोटीस

दिवाणी मुकद्दमा नं० २८१ सन १९०७

विद्यमान मुनसफ साहेब नंबर २ कोर्ट अकोला.

वादी

श्रीपुज्यजी श्रीनरपती चंद्रजी सुरीश्वरजी राहणार निंबाहेरा मेवाड स्टेट.

प्रतिवादी

१ कन्हयालाल हेमचंद २ हिरालाल शिवलाल, ३ पानाचंद फतेचंद, ४ मनुलाल छबीलदास, व ५ देवलाल सुंदरलाल. सर्वांची वस्ती पेठ बाळापूर ता० मजकूर जिल्हा अकोला.

सिव्हिल प्रोसिजर कलम ३० प्रमाणें जाहिर नोटीस. बाळापूर पेठ ता० मजकूर जि० अकोलें येथील लोकागच्छ केशवजी पंथाचे सर्व गुजराथी लोकांस कळविण्यांत येतें कीं श्रीपुज्य श्रीनरपती चंद्रजी गुरु रतनचंद्रजी यांनीं ज्या ज्या वेळीं आपण अगर आपले मुखत्यार बाळापुरास जातील तेव्हां तेथील जुने वसतींत जाऊन तेथील गादीवर बसून पुराण सांगण्याचा व जी दक्षिणा मिळेल ती घेण्याचा त्यांस हक्क आहे असें ठरवून घेऊन त्यास सदरहू वरील पक्षांतील मंडळीनें कोणतेही तऱ्हेनें हरकत करूं नये अशी त्या सर्वांस ताकीद मिळण्याबद्दल आमचे कोर्टांत दिवाणी मुकद्दमा नंबर २८१ सन १९०७ चा दावा त्या सर्व पक्षाविरुद्ध पक्षाचे पुढारी कन्हयालाल हेमचंद, हिरालाल शिवलाल, पानाचंद फतेचंद, मनुलाल छबीलदास व देवलाल सुंदरलाल याजवर केला आहे. तरी सिव्हिल प्रो० कलम ३० प्रमाणें त्या पक्षाचे व सर्व लोकांचे विरुद्ध वरील पुढाऱ्यांवर दावा चालविण्याचा वादीस कोर्टानीं परवानगी दिली आहे. व सदरहू मुकद्दम्याचे चौकशीची पुढील ता० १६-३-०८ इसवीं रोजी नेमली आहे. तरी बाळापूर येथील लोकागच्छ केशवजी पंथांतील सर्व लोकांस जाहिर या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ज्या कोणास सदरहू दाव्यांत आपल्यास प्रतिवादी करून घेऊन तक्रार करण्याची इच्छा असेल त्यानें स्वतः अगर वकील अगर कायदेशीर मुखत्यार मार्फत आमचे कोर्टांत ता. १६।३।०८ इ. रोजीं दिवसा १० वाजतां अगर त्यापूर्वी हजर राहून अर्ज करावे. ही नोटिस आज तारीख ५-२-०८ इ० रोजीं आमचे सही व शिक्या निशीं दिली असे.

K. B. Palsole

मुनसफ नं० २

नं. क. २६ इं. २ अकोले

---

## नोटीस

दिवाणी मुकदमा नंबर २८३ सन १९०७

विद्यमान मुनसफ साहेब नंबर २ कोर्ट आकोले.

| | |
|---|---|
| श्रीपुज्यजी श्रीनरपति चंद्रजी गुरु रतन चंद्रजी सुरीश्वरजी राहणार निंबा हेरा मेवाडस्टेट | वादी |
| १ कन्हयालाल हेमचंद २ फुलचंद पानाचंद ३ मनुलाल छबीलदास ४ जीवनलाल फतेचंद ५ त्रिभुवनदास शिवलाल गुजराथी सर्वांची वस्ती पेठ बाळापूर ता० मजकूर जिल्हा अकोला | प्रतिवादी |

सी. प्रो. क. ३० प्रमाणें जाहिर नोटीस.

बाळापूर पेठ तालुके मजकूर जिल्हा आकोला येथील लोकागच्छ केशवजी पंथाचे सर्व गुजराथी लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं श्री पुज्यजी श्री नरपति चंद्रजी गुरु रतनचंद्रजी महाराज यांनीं जुने वसईचें उत्तरे कडील घर गुलाबबाई मर्द रतनचंद इचे मालकीचे असून तें विकत घेतल्यावरून आपल्याकडे त्याची मालकी आली आहे व त्याचा लोकागच्छ केशवजी पंथाचे पुढारी कन्हयालाल हेमचंद व फुलचंद पानाचंद व मनुलाल छबीलदास व जीवनलाल फतेचंद व त्रिभुवनदास शिवलाल यांनीं त्यांचे तर्फे अन्यायानें कबजा घेतला आहे वरून त्या घरावर आपली मालकी ठरवून ताबा घेण्याकरितां आमचे कोर्टांत दिवाणी मुकदमा नंबर २८३ सन १९०७ चा दावा आणिला आहे. त्यांत सर्व लोकागच्छ केशवजी पक्षाचे लोक तर्फे वरील पुढाऱ्यांवर दावा चालविण्याबद्दल वादींनीं सी० प्रो० कलम ३० प्रमाणें परवानगी मागितल्यावरून त्यास तसें करण्याबद्दल हुकूम देण्यांत आला आहे. व सदरहू दाव्याची पुढील चौकशीची तारीख १६-३-०८ इसवी रोजीं आकोलें मुक्कामीं आमचे कोर्टांत नेमली आहे तरी लोकागच्छ केशवजी पंथातील ज्या कोणास सदरहू दाव्यांत प्रतिवादींत कोर्टांत आपलें नांव दाखिल करून तक्रार करणें असेल त्यानें वरील तारखेस अगर त्यापूर्वीं आमचे समोर स्वतः अगर वकील अगर कायदेशीर मुखत्यार मार्फत दिवसाचें १० वाजतां हजर राहावे ही नोटीस आज ता० ५-२-०८ इसवीं रोजीं आमचे सहीनिशी [illegible]निशीं दिली असें.

नं. क. १३ इं. २

## नोटीस

नोटीस बेशमी माहादु वल्द हनवता गाईकवाड रा. नागापूर तालुके मेहेकर जिल्हा बुलडाणें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको आहे लग्न होऊन आज सुमारें १४ चौदा वर्षें झालीं. ते दिवसांपासून अद्याप मजला घेऊन गेला नाहीं हल्लीं सज्ञान होऊन दोन तीन वर्षें झालीं आहे. माझे बापाची फार गरीबी असल्यानें मी अलग असल्यामुळें मजला खाण्यास कांहीं आधार नाहीं. वरून त्या सावकाराचें कर्ज काढून खाते. हल्लीं सावकाराचा मजवर तगादा आहे. तरी दरसाल रुपये ४० प्रमाणें रक्कम रु. ५६० पांचशे साठ रुपये देऊन मजला ८ दिवसांचे आंत घेऊन जावें. ह्या प्रमाणें आपण न केल्यास जगरितीप्रमाणें मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा माझेवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. नोटिशीचा खर्च द्यावा लागेल. कळावें. तारीख ११-२-०८ इ. दस्तुर गणपत राघोजी खडसे.

सही

पुंजाई मर्द माहादु गाईकवाड राहणार नागापूर इची निशाणी

नं. क. २७ बांगडी.

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकास कळविण्यांत येतें कीं आमचे भाचे नामे १ किसन २ गोविंदा ३ दिगंबर ४ मगन ५ बागलाल वल्द दूलीचंद गुजराथी राहणार बाळापूर हे अज्ञान असून त्यांचा वडील भाऊ नामे रूपचंद दुलीचंद राहणार बाळापूर हा दुर्व्यसनी असल्याकारणानें तो जिनगीची अफरातफर करीत आहे. तो शेते व घरें गहाण विक्री वगैरे देण्याच्या विचारांत असून कर्ज काढणार आहे असें ऐकतों. त्याला व्यवहार कांहीं समजत नाहीं. त्यानें जिनगीची बहिवाट करूं नये ह्मणून पूर्वींच त्यास तोंडी समज दिली आहे. असें असूनही दिलें चालील ती गोष्ट करूं लागल्यामुळें ही जाहिर खबर देणें भाग पडलें. त्याचा कोणताच व्यवहार अज्ञानांच्या हिस्सास बांधू शकणार नाहीं इतकेंच नव्हे तर त्याच्या हिस्यावर देखील कायदेशीर जोखीम पडणार नाहीं हें त्याच्याशीं देवघेव करणाऱ्यांनीं समजून घ्यावें त्यांनीं फसूं नये आणि आमची नुकसानी होऊं नये ह्मणून ही जाहिरात दिली आहे. ता. १८-२-०८

सही

नथूलाल ओंकारदास गुजराथी दुकान बाळापूर अज्ञान किसन, गोविंदा, वल्द दिगंबर- मगन, बागलाल दुलिचंद. अज्ञानाचा

नं. क. २८ कर्ता मामा द. खु.

---

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मी मर्द जानजी ठाकरे उर्फ बेतकार कुणबी राहणार बेलखेड ता. आकोट जि. आकोला इजला:—

खालीं सही करणार यजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी सख्खी मामी असून माझा मामा ता. २४ माहे जानेवारी सन १९०८ इ. रोजीं मरण पावला त्याची स्थावर व जंगम इस्टेट जेवढी आहे तिचा उपभोग तूं जिवंत आहेस तो पर्यंत तूं घ्यावास मात्र हल्लीं तुजला वर लिहिलेले जिनगीचा अफरातफर करण्यास ह्मणजे कोणास गहाण किंवा खरेदी किंवा दान गहाण देऊं नये. दिल्यास ते सर्व रद्द आहे. कळावें. तारीख २८ माहे जानेवारी सन १९०८ इसवी

सही

गणपत वा गोसाजी मारके

नं. क. २९ नि. खु०

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं माझा मामा जानजी व्हा चंद्रभानजी ठाकरे उर्फ बोहेरकार राहणार बेलखेड ता आकोट हा मयत झाला- तरी त्याची लग्नाची बायको लक्ष्मी हिनें कोणास स्थावर जंगम इस्टेट गहाण- किंवा खरेदी दिल्यास कोणी घेऊं नये घेतल्यास हें सर्व रद्द समजलें जाईल. कळावें ता. १५-२-०८

सही

गणपत वा गोसाजी मारके याची हातची निशाणी असे ता. आकोट जि. आकोला रा. हिवरखेड

नं. क. ३० रूपराव.

---

## जाहिर खबर

बक्षीस रुपये १५

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचा धाकटा बंधु नामे नागना वा मुतैया जात तेलंगी फुलमाळी उमर वर्षें १२ चेहरा सधारण गोरा तोंड जरा लांबट आहे. आंगानें सडपातळ व उंची ४। चार फूट कानांत मुरक्या सोन्याच्या आहेत डोक्यास कोशाचा पटका आहे आंगांत खादीचा कोट आहे धोतर रेशीमकांठी आहे येणें प्रमाणें रंग निशाणीचा मुलगा बेपत्ता झाला तो ता. २५ नोवेंबर १९०७ पासून आहे जो कोणी सांपडून देईल त्यास वरील इनाम देऊं कळावें ता. २-२-०८ इ.


सही

गणपत मुतैया तेलंगी फुलमाळी राहणार बेरगांव मंजू तालुके

नं. क. ३१ जि. अकोला म०

---

### आमचें पेंड यंत्र लोकांना पसंत आहे.



मे. किर्लोस्कर बंधू बेळगांव यांस— मा. न. वि. वि. तुह्मीं कृपाकरून पाठविलेलें कडबा कापण्याचें यंत्र सुरक्षित पोंचलें. त्यानें कडबा फारच चांगला कापला जातो. सदरहु यंत्र इकडील लोकांना फारच पसंत पडलें आहे, व त्या बद्दल बऱ्याच मागण्या आपणाकडे येतील. त्या मानानें किंमत (रु १०-१०) ही फारच कमी ठेवलेली आहे. कळावें ही विनंती. ता. ४-२-०८

सही

जहागीर सीपरीया काल(ग्वालेर) } श्रीमंत नानासाहेब फाळके दफ्तरदार

नं. क. ३२

---

## नोटीस

ती० गंगाभागिरथी भिमाई मर्द मारोती ठाकरे राहणार मौजे पींपळखुटे खु० प्रगणे चांदूर तालुके मल्कापूर इसः—

खालीं सही करणार यांचेकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आमचे वडील बंधूची गंधर्वाची स्त्री आहेस मयत मारोती व आह्मी सखे बंधु आहोंत. वडिलोपार्जिताची जिनगी आजवर सवाईक एकत्र असल्यानें व मारोती हा वडील बंधू असल्यानें जमीनीचें खातें मयताचें नांवानें झालें होतें. मयत वारल्यास सरासरी ६ महिने झाले आहेत. तुह्मी वृद्ध असून आह्मास वडिल आहांत तुमची सर्व इस्टेटीवर अन्नवस्त्र दान धर्म वगैरे असमचे संमतीनें करण्याची मालकी आहे. मत्र वडिलोपार्जिताची इस्टेट कोणास गहाण खरीदी बक्षीस अगर दान वगैरे देण्याचा कोणतेहि प्रकारे मालकी शास्त्राप्रमाणें मुळींच नाहीं. इतकेंच तुह्मांस पुष्कळवेळां कळविलेंच आहे व पोष्ट मारफत तुह्मास या पुर्वीं ही नोटिशीनें कळविलेंच आहे तरी यापुढें तुह्मास कळविलें जात आहे कीं कोणतेही तऱ्हेनें तुह्मी इस्टेटीची अफरातफर करूं नये तसें केल्यास सर्व प्रकारें जबाबदार तुह्मास धरले जाईल ही नोटीस दिली सही तारीख १५-२-०८

सही

निंबाजी वा गडबडजी ठाकरे नि. खु.

तुकाराम वा गडबडजी ठाकरे नि खु.

दस्तूर माधव सहदेव पींपळखुटेकर

उभयतां राहणार पिंपळखुटे प्रगणें चांदूर

नं. क. ३३ तालुके मलकापूर.

---

## नोटीस

नोटीस बेशमी देवकिसन चत्रभूज राहणार नांदुरे याजलाः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तू आमचा पुतण्या असून तुझा बाप वारल्यामुळें आह्मी तुजला आजवर वागविलें. हल्लीं तूं बावळा झाल्यासारखा दिसत आहेस आमची नांदुरें व मारवाड या दोन ठिकाणीं स्थावर जंगम जिनगी आहे तिजवर तुझा कोणतेच प्रकारे हक्क नाहीं. ती आमची स्वसंपादित आहे. तूं ती कोणास गहाण खरीदी बक्षीस व अन्य तऱ्हेनें देऊं नये दिल्यास त्याचा तूंच जबाबदार आहेस कळावें ता. ५-२-०८ इ.

सही

संपतराय हेमराज या नांवाचें दुकानचें भागीदार व वहिवाटदार मालक जेठमल थावरमल नि. खु. हातची

नं. क. ३४ असे.

---

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं आमचा पुतण्या नामे देवकिसन हा बावळ्या सारखा झाल्याचें दिसत आहे. आमची नांदुऱ्यांस व मारवाडांत स्थावर जंगम जिनगी आहे तिजवर त्याचा कोणतेच प्रकारचा हक्क नाहीं. त्याचे जवळून कोणी गहाण खरीदी या अन्यतऱ्हेनें घेउं नये. घेतल्यास त्याचा तो स्वतः जबाबदार राहील कळ.वें ता. ५-२-०८ इ.

सही

संपतराय हेमराज मालक जेठमल थावरमल नि. खुद.

नं. क. ३५

---

## नोटीस

रा० यमाजी राऊत हामाल राहणार आकोला यांसः—

खालीं सही करणार राहणार उंद्री तालुके चिखली जिल्हा बुलडाणा इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची गंधर्वाची बायको असून तुह्मी मला आज ३॥ वर्षें झालीं टाकून दिले आहे. मी आजारी असतनांही तुह्मी माझा समाचार घेतला नाहीं. व पुढेंही तुह्मी आजपर्यंत मला नेण्यास आला नाहीं. त्या योगानें मला एकंदर दुखण्याचे बद्दल ६० रुपये खर्च लागला व आजपर्यंत खाण्यास खर्च ३०० तीनशे रुपये लागला. असा एकंदर खर्च ३६० रुपये मी एका सावकाराकडून काढून निर्वाह केला. तरी तुह्मी ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसांचे आंत येऊन माझें कर्ज व्याजासुद्धा सावकारास देऊन मला कर्ज मुक्त करावें व मला तुमचे घरी घेऊन जावें व पुढेंही मला चांगले रीतीनें वागवाल अशा तऱ्हेची पंचांची खात्री करून देऊन मजला घेऊन जावें. वरील मुदतींत तुमचे कडून सर्व व्यवस्था न झाल्यास माझेवर तुमचा हक्क राहणार नाहीं. नंतर मी माझे निर्वाहाचें सोई करितां दुसऱ्याशीं गंधर्व लावीन. पुढें तुमचा हक्क मजवर राहणार नाहीं. कळावें ता० १०-२-०८ इ०

सही

मुक्ती मर्द यमाजी राऊत निशाणी खुद दस्तूर

नं. क. ३६ रामचंद्र गंगाराम

---

## नोटीस

कादरअली वल्द सयदमुनीर व सयदअबास वल्द सयदआमीर मुसलमान राहणार आकोट तालुके मजकूर यांस—

नोटीस देणार मनवरखा वल्द मदारखा मुक्काम राहणार मोहाळ हल्लीं मुक्काम हिवरखेड तालुके आकोट नोटीस देण्यांत येते कीं मौजे मोराडी येथील शेत सर्वे नंबर ३५ चे मौजे दिवाणझरी उर्फ कवठझरी येथील शेत सर्वे नंबर ४ यांतील निमे हिस्सा असीं दोन्हीं शेतें तुह्मास खरीदी दिलीं आहे. तुमचे ह्मणण्याप्रमाणें भरणा रजिष्टर साहेब याचे समोर कबुल करा असें तुमचे ह्मणण्याप्रमाणें कबुल केलें परंतु भरणा मुळींच दिला नाहीं. दस्तऐवज नोंदून दिल्यावर तुमचे घरीं पैसे मागण्यास पुष्कळ

वेळ आली खरीदी खताचा भरणा अजपर्यंत कांहींएक दिला नाहीं. सबब तुह्मांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं सदहू दिलेलें खरीदीखत मजला भरणा न दिल्यामुळें रद्द समजावें. त्यावर तुमचा कोणते प्रकारे हक्क राहिला नाहीं. ही नोटीस दिली तारीख १० माहे फेब्रुवारी सन १९०८ इसवी दस्तूर नारायण कृष्णराव तेल्हारा.

सही

मनवरखा वल्लद मदारखा

नं. क. ३७ मुसलमान निशाणी खुद्द

---

## नोटीस

रा० रा० हनवंतगीर गुरु राघोगीर गोसावी राहणार विर्रे तालुके बाळापूर यांस:—

खालीं सही करणारीण इजकडून कळविण्यांत येते कीं १२ बारा वर्षांपूर्वी माझें लग्न तुह्मांबरोबर लागलें तेव्हां आपसांतील भाडणतंट्यावरून लग्न पुरें होण्यापूर्वीच तुह्मी सर्व दागदागिना उतरून घेतला आणि माझ्या लग्नाची काडी तोंडानें मोडून दिली इतक्यावरून माझ्या कपाळाचें कुंकु चारचौघा समोर पुसण्यांत आलें. तुह्मीहि त्यावेळच्या तोंडी फारकती प्रमाणें साक्षी विचारपूस केली नाहीं; आणि लेखी फारकत देण्यासाठीं मी तुह्मास ह्मटलें तर तुह्मी पैसे पुष्कळसे मागतां. ही गोष्ट अगदीं गैर आहे. तुमच्या या वाईट गोष्टीमुळें माझा जन्म व्यर्थ चालला असून मला पोटापाण्या संबंधानें अडीचशे तीनशे रुपये कर्जाचें नुकसान झालें आहे. ही नुकसानी सालोसाल वाढत चालली असून माझा यापुढें नाइलाज झाला आहे. तुह्मी गोडीगुलाबीनें लेखी फारकत देऊन मला दुसरा घरठाव करण्यास आडकाठी ठेऊं नये. आठ दिवसांची मुदत दिली आहे. या मुदतींत तुह्मी वरील गोष्ट पुरी न केल्यास ही जाहिर नोटीस हीच फारकत समजून ही दुसरा घरठाव करीन. कळावें. ता० १६।२।०८ इ०

सही

जनाबाई बापाचें नांव आदितवारपुरी गोसावी

राहणार उगवें ता० आकोला

निशाणी खुद्द

नं. क. ३८ बागडी.

---

## नोटीस

मारुती गणूसा कलाल व संपत वा॥ रावजी पाटील. रा. चतारी ता. बाळापुर जि. आकोला यास—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची भावजई नांमे सोनी इच्या जवळून तुह्मी उभयतांनीं कांहीं पैसे वगैरे न देतां तिच्या नकळून आमचीं शेतें खरेदी करून घेतलीं. कारण ती आमची भावजई आमच्यांत नसून तिचा व आमचा कांहींएक संबंध नाहीं. कारण तिनें पोट वगैरे आणले आहे व जें काम करूं नये तें तिनें केलें व जातींत नाहीं. तर आतां तुह्मांस कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासुन ८ दिवसांचे आंत वरील खरेदीचा निकाल करावा असें जर नकराल तर तुह्मावर कोर्ट मार्फत परस्वणकी बद्दल योग्य तजवीज करावी लागेल तुह्मी दिवाणींत आपला हक्क शाबीत करून नंतर शेतात यावे. विनाकारण तंटा कराल तर फौजदारीस कारण व्हाल कळावें.

सही

नेमासा हिरासा लाड दस्तूर खूद रा. नायेगाव ता. मेहकर

नं. क. ३९ जि. बुल्ढाणा.

---

## जाहिरांत

सर्वत्र लोकास खली सही करणार याजकडून जाहिर करण्यांत येतें कीं माझे कडून रामजी वा॥ हैबतजी लकडे जात कुणबी राहणार मौजे सेंदूरजना प्र० व तालुके मंगरुळपीर जिल्हा आकोला यांस कूल मूखत्यार नेमिले होते. त्या प्रमाणें तो आजपर्यंत काम पहात आला. परंतु आज तारखे पासून पूढें त्यांचें मुखत्यारपत्र आह्मी रद्द केलें आहे करिता सदरहू इसमानीं सरकारि कामांत देवघेवी संबंधात व इतर कोणतेंही कामांत माझे तर्फेनें व्यवहार करूं नये केल्यास मी त्याजबद्दल जबाबदार रहाणार नाहीं कळावें. ता १२ २ ०८

दस्तूर गजानन देविदासकांत जहागीरदार

सही

नि॥ मारुती वा॥ हणमोजी लकडे सेंदूरजनेकर यांचे

नं. क. ४० हातची खूद असे

---

## नोटीस

बेशमी—उदेभान वा नारायण कुणबी राहणार कान्हेरी पो. आकोला.

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुला मी. फसली १३१६ सालाकरितां २ शेतें सर्वे नं. ११५ व १८७ अनुक्रमे एकर गुंठे व सारा एकर १६२७ व १४०२३ व सारा ६७ व ३१ व १३१७ फसली सालाकरितां शेत स. १८७ एकर गुंठे १४०२३ सारा रु. ३१ बटईनें तुह्मास वहाण्यास दिलीं होतीं व त्याप्रमाणें आपण तीं वाहून त्याचें पीक वाटून घेण्यास सांगत असतां आपण पिक घरीं घेऊन गेलांत. व माझ्याकडे असलेल्या कर्जात फेड करून घेतो असें पहिल्या वर्षी सांगितलें. व ह्या वर्षीहि आपण पिक घरीं घेऊन गेलांत तेव्हां ही मला अशीच थाप दिली. व मागाहून मला असें समजलें कीं आपण माझ्यावर असलेल्या रोख्याबद्दल फिर्याद करणार आहां व आणखीहि मला असें समजलें कीं आपण असें ह्मणतां कीं जर मला पिकाची रकम हवी असेल तर कोर्टाची पायरी चढावी मी तसा देवाल नाहीं तर या नोटीशीनें असें कळवितों. ही नोटीस पावलें पासून आठ दिवसांच्या आंत मजकडे येऊन आपला हिशेब करावा नाहींतर मी (१) आपण जर फिर्याद केला तर आपला खर्च देणार नाहीं (२) आपण जर फिर्याद केली तर मला उत्पन्नबद्दल फिर्याद करणें भागपडेल तर त्याचा खर्च आपणास द्यावा लागेल (३) आपणस रुपये पावले असतां आपण खोटी फिर्याद करून मला वकीली वगैरेचा खर्च पडेल तर तोहि खर्च आपणाकडून वसूल निराळी फिर्याद करून केला जाईल इतक्या सर्व गोष्टींची जरूर पडूं नये ह्मणून आपणास हें सुचवत आहे कीं आपण माझ्या पिकचा हिशेब करून माझे पैसे आपणाकडे निघत असतील तर रुपये देऊन पावती घ्यावी अगर जर माझेकडे पैसे निघत असतील तर मी पैसे देऊन पावती घेईन असें जर मुदतींत झालें नाहीं तर मग मला कोर्टाची पायरी चढावी लागेल व त्यास लागणारा सर्व खर्च व या नोटीशीचा खर्च आपणास द्यावा लागेल व आणखी मी आपणाकडून १२५ रुपये दिवाळी झाल्यावर काढलें होते ते मी तुह्माला रा. मोतीलाल यांच्या समक्ष दिले व त्याची पावती मागत असतां आज देतो उद्यां देतो करून अजून दिली नाहींत तर ती ही पावती नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसांचे आंत द्यावी कळावें ता० २४-२ ०८

सही

बळीराम वा सोनाजी राहणार

नं. क. ४१ कान्हेरी दस्तुर खुद्द

---

## नोटीस

रा० रा० जगदेवगीर माजीपाटील राहणार मौजे बुसर तालुके आकोला यांस:-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास एकोण पन्नास रुपयाचा पुरजा मागील पुरज्याचा हिशोब करून लिहून दिला त्यास आज अदाजा ९ वर्षें झालीं. त्या पुरज्याचा निकाल तुकाराम पाटील सखाराम सावळे यानीं व्याजासुद्धा ६२ रुपयांवर केला सदर्हू ६२ रुपयापैकीं ५० रुपये तुकाराम पाटील यानीं आपल्या हातानीं दिले व १२ रुपये देणें राहिले ते मी लिहिलेला पुरजा व मागील सर्व पुरजे द्यावे असें ठरले त्या प्रमाणें मी तुह्मास चिंधु पाटील यांचे समोर रुपये १२ दिले व पुरजा मागूं लागलो तर तुह्मी आज देतो उद्या देतो पुरजे निघत नाहींत असें सांगितलें तुह्मी सावकार असल्यामुळें मजला भरवसा आला. शिवाय माझे मागील ही देण्याघेण्याचे कागद तुमचेच पाशीं असून ते मजला दिलें नाहींत. ह्मणून तुह्मास या नोटिशीनें कळविलें जातें कीं तुमचे मजला कांहीं देणें राहिलें नाहीं तुमचे पाशीं असलेले सर्व कागद चालू पुरज्या समेत रद्द समजण्याचे आहेत ही नोटीस दिली कळावें ता. ९-२-०८ इ०

सही

लक्ष्मण वल्लद चंद्रभान कुणबी

राहणार बुसर याची निशाणी

नं. क ४२ खुद्द हातची असें.

---

## नोटीस

एन भुमय्या वल्लद रंगया क्लाथ मरचंट राहणार उमरावती यांस —

नोटीस देणार हनमंतु वल्लद कुंड्या शिंपी राहणार आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तारिख २७ माहे जानेवारी सन १२०८ इसवी रोजीं प्रमोद सिंधे जाहिर नोटीस दिलां त्याचें उत्तर असें कीं तुह्मी जी जाहिर नोटीस मला दिली आहे ती अगदीं खोटी आहे व मला मुळींच कबुल नाहीं. मयताचे डागिने माझे जवळ नाहींत. व मी तुमचे कोर्ट खर्च इतर कोणत्याही खर्चास जबाबदार नाहीं. आह्मी तुह्मास आकोलें येथें पंचा समक्ष डागीनें आमचे जवळ नाहीं असें सांगितलें आहे. कळावें तारीख ९ माहे फेब्रुवारी सन १९०७ इसवी दस्तूर रामचंद्र रमाकांत सनकापूरकर.

सही

नं. क. ४३ हनमंतु कोंड्या.

---

## नोटीस

नोटीस बेशमी रोडी वल्लद शिवराम कुणबी राहणार पारखेड ता० आकोला

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी मारोती वल्लद भवानी राहणार पारखेड याजपासून तुह्मी राहातां तें घर विकत घेतलें. ज्या वेळेस विकत घेतलें त्या वेळेस या घरांत तुह्मी मारुतीच्या मारफतीनें राहात होता. मारोतीनें तुह्मास घर रिकामें करून माझे ताब्यांत द्या असें ह्मटलें असतां तुह्मी खाली करून देतो असें सांगितलें त्यानंतर मीही अनेक वेळां घर रिकामे करून मागितलें असतां घर रिकामे करून देत नाहीं. यासाठीं या नोटिशीनें तुह्मास कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्यापासून तीन दिवसांचे आंत घर रिकामे करून आमचे ताब्यांत द्यावे. या प्रमाणें न केल्यास आह्मी तुमचेवर दिवाणींत ताब्याबद्दल फिर्याद करून कोर्टखर्चासुद्धा व नोटिशीचा खर्चसुद्धां वसूल करून ताबा घेऊं. ही नोटीस दिली सही. तारीख २९।१।१९०८ इसवी

सही

तुकाराम वल्लद सखाराम

नं. क. ४४ राहणार पारखेड द० खुद्द

---


त्वरा करा ! त्वरा करा?

## बायसिकल टीचर

आमचेकडे सायकल फार थोड्यां वेळांत आणि उत्तम रीतनें शिकविले जाईल दर माफक असून बकशिर काम केलें जाईल आजवर ५०० शे माणसापेक्षां जास्त लोकांस सायकली शिकविल्या आहेत. बाहेर गांवच्या लोकांकडून रेल्वेभाडे व जेवण खर्च घेतला जाईल. सायकली ही दुरुस्त केल्या जातील. नवीन सायकली विकत मिळतील.

जेकब.

सायकल टीचर.

पत्ता:----

[illegible]हमद अली कासमजी बोहरा

नं ४८ आकोला ( शहर


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.